# पंढरी संचार

• पंढरपूर • गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - २६४




'आदर्श बँक पुरस्कार-२०२५' चा मर्चंट बँकेस प्रदान

PII



ना. फडणवीस व पद्मजादेवी मोहिते पाटील यांची बंद दाराआड चर्चा

PIII

## नियम डावलून १० कोटी ४७ लाख रुपये ॲडव्हान्स वाटप

# विठ्ठलच्या माजी 55 संचालकांना नोटीसा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर : विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने सन २०१५-२०१६ व सन २०१६-१७ या कालावधीमध्ये नियम डावलून ऊसतोड ठेकेदार ऊस वाहतूक ठेकेदार यांना १० कोटी ४७ लाख रुपयाचे वाटप केले. याची गंभीर दखल घेऊन लेखा अधिकारी यांनी माजी ५५ संचालक व १५ अधिकारी यांना नोटीस बजावली आहे. आता चेअरमन आमदार अभिजीत पाटील कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.**




गेल्या काही वर्षापासून विठ्ठल कारखान्यातील संचालक मंडळाने मनमानी कारभार केला असल्यामुळे कारखाना आर्थिक संकटात सापडला. यामुळे कारखान्याचे दोन गाळप हंगाम होऊ शकले नाहीत. साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीत आमदार अभिजीत पाटील यांनी पॅनल उभा केला होता. यावेळी निवडणुकीत त्यांनी सभासदांची देणे देऊन कारखाना सुरू करणार असून कारखान्याने अनेकांना नियम व अटी न पाहता कोट्यावधी रुपयाचे वाटप केले आहे. यामुळे कारखाना आर्थिक अडचणीत सापडला असून कारखान्यावर कोट्यावधी रुपयाचे कर्ज आहे. संचालक मंडळ निवडणुकीत आपले पॅनल विजयी झाल्यानंतर कारखान्याने दिलेली देणे आपण वसूल करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले होते. पाटील यांनी कारखाना चांगल्या प्रकारे चालविण्याचा विश्वास सभासदांना दिल्यामुळे संचालक मंडळ निवडणुकीत सभासदांनी पाटील यांच्यावर विश्वास ठेवून पाटील यांचे पॅनल विजयी केले. यानंतर पाटील यांनी कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीची माहिती घेऊन शेतकऱ्यांची देणे देऊन साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू केला. यामुळे सभासदातून आनंद व्यक्त करण्यात आला.

दोन वर्षापासून विठ्ठल साखर कारखाना चांगल्या प्रकारे सुरू आहे. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर चेअरमन आमदार अभिजीत पाटील यांनी ऊसाला ३५०० उच्चांकी दर देण्याची घोषणा केली. यामुळे जिल्ह्यातील साखर कारखान्यामध्ये खळबळ उडाली. सध्या साखर कारखाने आर्थिक अडचणीत असताना चेअरमन अभिजीत पाटील यांनी जादा दर जाहीर केल्यामुळे सभासदातून आनंद व्यक्त करण्यात आला. विठ्ठल कारखान्याचे लेखा परीक्षण करण्यात आले असून सन » पान ३ वर

## At a Glance

### आमदारांनी स्वीकारलेले लेखी निवेदन

**माढा :** माढ्याचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांना ग्रामसेवक संघाचे राज्याध्यक्ष टी. आर. पाटील यांचे शिष्टमंडळ जिल्ह्यातील पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना तत्कालीन झेडपीच्या सीईओंनी एका परिपत्रकाद्वारे दिलेले अधिकार रद्द करण्यात यावे, मागणीबाबत चर्चा करण्यासाठी गेले होते. या दरम्यान आमदारांनी शिष्टमंडळाकडून लेखी निवेदन स्वीकारले. ते वाचत असताना माढ्यातील काही गावातील ग्रामसेवकांना मी स्वतः नागरिकांच्या कामानिमित्त थेट फोन केल्यानंतरही ती कामे झाली नसल्याची नाराजी या नेत्यानं राज्याध्यक्षांकडेच व्यक्त केली.



### पेट्रोलने पेटवून घेऊन आत्महत्या

**माढा :** माढा तालुक्यातील पाथनस येथील राहत्या घरी अज्ञात कारणावरून स्वतःच्या अंगावर पेट्रोल ओतून नागनाथ चांगदेव शेळके (वय ५८) यांनी आत्महत्या केली. नागनाथ यांना उपचारासाठी सासरे मोहन दुधाळ यांनी मंगळवारी पहाटे ४: १५ वाजता सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.



### बेशुद्धीचे इंजेक्शन न लागल्याने वाघ पसार

**सोलापूर :** येडशी अभयारण्यात गेल्या दोन महिन्यांपासून वास्तव्यास असलेल्या वाघाला पकडण्यासाठी वनविभाग आणि रेस्क्यू पथकाने रात्री मोठा प्रयत्न केला. वाघाला बेशुद्ध करण्यासाठी बंदुकीच्या साह्याने इंजेक्शन मारण्यात आले. मात्र तो न बेशुद्ध होता जंगलात पसार झाला. त्यामुळे गेले दोन दिवस वाघाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू असूनही त्याचा ठावठिकाणा लागत नसल्याने वनविभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. गेली अनेक दिवस वाघ वनविभागाच्या अधिकाऱ्यांना हुलकावणी देत आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात भितीचे वातावरण पसरले आहे.



### केंद्राचा महाराष्ट्रातील खासदारांनी केला निषेध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करत सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील खासदारांनी संसद भवन परिसरात निदर्शने करून निषेध केला. यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सोयाबीनचा सध्या बाजारभाव प्रति क्विंटल ४, ३०० या किमान आधारभूत किमतीपेक्षा (एमएसपी) खाली गेला आहे. ज्यामुळे शेतकरी उत्पादन खर्च वसूल करू शकत नाहीत. ऊस खरेदीला उशीर आणि तातडीने मदत उपाययोजनांचा अभाव यामुळेही संकट आणखी वाढले आहे.

## ऊस वाहतूक करणाऱ्या २० हजार बैलांना लंपीचे लसीकरण



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** गेल्या काही वर्षापासून जनावरांना लंपी आजार होत असल्यामुळे या पार्श्वभूमीवर पशुवैद्यकीय विभागाने खबरदारी घेतली आहे. परराज्यातून व परजिल्ह्यातून येणाऱ्या जनावरांना लंपीचे लसीकरण केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर ऊस वाहतुकीसाठी आलेल्या २० हजार बैलांची तपासणी करून त्यांना लंपीची लस देण्यात आली आहे .

तीन वर्षांपूर्वी गुजरात, कर्नाटक या राज्यात लंपी रोगाने शिरकाव केला. हा रोग गाय, म्हैस, बैल यांना होत असल्याचे आढळून आले. या आजारामुळे अनेक जनावरे दगावली. याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने परराज्यातून येणाऱ्या जनावरांची तपासणी करण्याची मोहीम सुरू केली. हा रोग महाराष्ट्रात पसरू नये याची खबरदारी घेतली. मात्र तरीही या रोगाने महाराष्ट्रात शिरकाव केलाच. पशुवैद्यकीय आरोग्य विभागाने चांगल्या प्रकारे नियोजन करून प्रत्येक जनावरांना लंपी लस दिली. यामुळे या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झाला नाही. हा रोग जास्त प्रमाणात पसरू नये म्हणून प्रशासनाने जनावरांच्या बाजारावर बंदी घातली होती. हा रोग आटोक्यात आल्यानंतर जनावरांचा बाजार सुरू करण्यात आला आहे.

सध्या काही जिल्ह्यात लंपी रोगाने पुन्हा शिरकाव केला असल्याचे दिसून येत आहे.या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून पशुसंवर्धन विभागाने परजिल्ह्यातून येणाऱ्या जनावरांची तपासणी सुरू केली आहे. सध्या साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू आहे. यामुळे उसाची वाहतूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बैल सोलापूर जिल्ह्यात दाखल झाले आहेत. सुमारे २० हजार बैलांची तपासणी पशुसंवर्धन विभागाने केली असून या बैलांना लंपीची लस देण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यात होणारा लंपीचा प्रादुर्भावावर आळा बसला आहे.



### सख्या बहिणींचे एमपीएससी परीक्षेत यश

**सोलापूर :** कामगार वस्ती परिसर असलेल्या सोलापुरातील गवळी वस्तीमधील गलिच्छ वस्ती सुधारणा मधील आठ पत्र्याच्या घरातील गॅरेज चालकाच्या दोन्ही मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यशाचा झेंडा रोवला आहे. संजीवनी आणि सरोजिनी ज्योतीराम भोजने अशी त्या दोन सख्ख्या बहिणींची नावे आहेत. त्यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून महसूल सहायक व कर सहायक ही पोस्ट मिळविली आहे. मंगळवारी रात्री महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.

## प्रवाशांचा कल खाजगी वाहनाकडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** एसटी ही गावगाड्यातील तसेच शहरातील ही सर्वसामान्य जनतेची जीवनवाहिनी आहे. परंतु सांगोल्यातील जुन्या एसटी बसचे नवीन दर येथील प्रवाशांना परवडत नसल्याचे बोलले जात आहे. परिणामी यात्रा काळात गाव गाड्यातून खाजगी वाहनांमधून देवदर्शनासाठी जाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. जीप, पिक- अप, छोटा हत्ती, क्रुझर, छोट्या लक्झरी यासारख्या वाहनांना अधिक मागणी वाढल्याचे सांगण्यात येत आहे.

सांगोला एसटी बस स्थानकात 52 एसटी बसेस आहेत. मागील सुमारे चार ते पाच वर्षापासून आगाराला नवीन बस मिळाली नाही. बस स्थानकातील सध्या चालू स्थितीत असलेल्या बस मधूनच काही बस आता मर्यादा संपल्यामुळे कालबाह्य होणार आहेत. तत्पूर्वी आहे या बसवर आगारातून प्रवाशांना ने आण केली जात आहे. परिणामी अनेकदा एसटी बसचा खोळंबा होतो. प्रवाशांना दुसरी बस उपलब्ध होईपर्यंत ताटकळत थांबावे लागते. हा प्रकार वारंवार घडत असताना, यामध्येच एसटी महामंडळाकडून 29 जानेवारीपासून तिकिटामध्ये 15 टक्के दरवाढ लागू केली आहे. ही दरवाढ प्रवाशांना न परवडणारी असल्याने, प्रवाशांनी आता खाजगी वाहनांकडे आपला मोर्चा » पान ३ वर



## डाळिंबाला मिळाला उच्चांकी २३० रुपये किलो दर; शेतकऱ्यांमधून आनंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झालेल्या डाळिंब सौदे बाजारात डाळिंबाला 230 रुपये किलो उच्चांकी दर मिळाला. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला डाळिंबाचे हब होते. या ठिकाणी दर्जेदार डाळिंब तयार होत होते. हे डाळिंब प्रदेशात विक्री करण्यात येत होते. मात्र गेल्या पाच वर्षात डाळिंबावर तेल्या व मर रोगाचा प्रादुर्भाव झाला. यामुळे शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या बागा उकडून टाकल्या.डाळिंबास चांगला दर व प्रदेशात मागणी असल्यामुळे काही शेतकऱ्यांनी दर्जेदार डाळिंब ची लागवड केली. यामुळे सोलापूर जिल्ह्यात पुन्हा डाळिंबाचे उत्पादन होण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे डाळिंबाचे सौदे होतात. मंगळवारी झालेल्या सौदे बाजारात डाळिंबाला प्रति किलो 230 रुपये उच्चांकी दर मिळाला. यामुळे शेतकऱ्यांतून आनंद व्यक्त करण्यात आला. सोलापूर जिल्ह्यात दर्जेदार डाळिंबे तयार व्हावीत यासाठी डाळिंब संशोधन केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा ओढा पुन्हा डाळिंबाकडे वाढला असल्याचे दिसून येत आहे.



## एकनाथ शिंदेंमुळे महायुती सत्तेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** लोकसभेत दारुण पराभव झाल्यानंतर महायुतीने राज्यातील विधानसभा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व चेहरा पुढे करून लढवली. राज्यातील मराठा आंदोलनपासून ते लाडक्या बहिणींमुळे व वैद्यकीय मदतीमुळे एकनाथ शिंदे यांच्याबद्दल महाराष्ट्रात सहानुभूती तयार झाली होती. या सहानुभूतीच्या लाटेवर महायुतीला भक्कम यश मिळाले. मात्र, मुख्यमंत्री नेमताना एकनाथ शिंदे यांना दूर ठेवले. त्यामुळे जनतेच्या मनातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच आहेत असा दावा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केले.



## 'व्हॅलेंटाईन डे' वर निर्भया पथकाची करडी नजर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** प्रेमिकांचा दिवस म्हणून 14 फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो. या दिवशी तरुण-तरुणी एकमेकांना भेटून हा दिवस आनंदाने साजरा करतात. मात्र या दिवशी एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता असते. यामुळे १४ फेब्रुवारी रोजी निर्भया पथक व्हॅलेंटाईन डे वर करडी नजर ठेवणार असल्याची माहिती निर्भया पथकाच्या प्रमुख सपोनि विभावरी रेळेकर यांनी दिली.

तरुणी व महिलांची छेड काढण्याचे प्रकार वाढत आहेत. यामुळे रोड रोमीओंवर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी खास निर्भया पथकाची नियुक्ती केली आहे. पंढरपूर विभागामध्ये निर्भया पथक तैनात करण्यात आले असून दररोज या पथकाकडून शाळा, कॉलेज, गर्दीची ठिकाणे, खाजगी क्लासेस, स्टेशन रोड आदी ठिकाणी पाहणी करून रोड रोमींओंवर कारवाई केली जाते. जानेवारी महिन्यामध्ये 120 रोड रोमीओंवर कारवाया करण्यात आल्या आहेत.

14 फेब्रुवारी हा व्हॅलेंटाईन डे म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवशी तरुण-तरुणी एकमेकांना भेटून भेटवस्तू देऊन आनंद साजरा करतात. तर काही तरुण या दिवसाचे औचित्य साधून एकतर्फी प्रेमातून तरुणींना त्रास देतात. म्हणून निर्भया पथकाने 14 फेब्रुवारी रोजी करडी नजर ठेवली आहे. निर्भया पथकाच्या प्रमुख सपोनि विभावरी रेळेकर, पोलीस सागर सावंत, शिवाजी झांबरे, महिला पोलीस निर्मला वाघमारे, राणी खडतरे, पांडुरंग टिंगरे हे पथक पंढरपूर शहर व तालुक्यात फिरून रोडरोमीओंवर करडी नजर ठेवणार आहे. एखादा रोड रोमिओ तरुणींची छेड काढत असल्याचे दिसल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.




### तरुणींनी या नंबर वर संपर्क साधावा

एखादा रोड रोमिओ तरुणींची छेड काढत असेल तर तरुणींनी 91 12 22 63 52 या क्रमांकावर फोन करावा अथवा मेसेज करावा असे आवाहन सपोनि रेळेकर यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

# बचत गटाच्या वस्तू आता मॉल मधून विक्री होणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** महिला बचत गटाची चळवळ राज्यात चांगल्या प्रकारे सुरू झाली आहे. बचत गटाच्या माध्यमातून लाखो महिलांना काम मिळाले आहे. बचत गट विविध प्रकारच्या वस्तू तयार करतात. त्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून दहा जिल्ह्यात दहा मॉल उभा करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यामुळे बचत गटामधून आनंद व्यक्त होत आहे. मुंबई येथे एका कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.



ते म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन प्रयत्न करत आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना अर्थसाह्य करण्यात येत आहे. तसेच त्यांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीसाठी बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. महिलांसाठी शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. एस.टी.मध्ये महिलांना सवलतीमध्ये प्रवास करण्याची संधी देण्यात आली आहे. आता बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या वस्तू विक्री करण्यासाठी दहा जिल्ह्यांमध्ये 10 मॉल उभारण्यात येणार आहेत. या मॉलमध्ये बचत गटाने तयार केलेल्या वस्तूची विक्री करण्यात येणार आहे. यामुळे वस्तूंना चांगली मागणी येऊन बचत गटांना आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

बचत गटाच्या माध्यमातून राज्यात लाखो महिलांनी विविध वस्तू तयार करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे त्यांच्या संसाराला हातभार लागला आहे. चूल व मूल एवढ्या पुरते महिलांनी काम न करता संसाराला हातभार लावण्यासाठी बचत गटामध्ये सहभागी व्हावे.

यासाठी शासनाने बचत गटांना अर्थसाह्य केले आहे. यामुळे अनेक महिला बचत गट तयार झाले आहेत. या बचत गटांनी विविध वस्तू तयार करण्यास सुरुवात केली असून लाखो रुपयाची उलाढाल होत आहे. आता महिलांनी तयार केलेल्या वस्तू मॉलमध्ये विक्री सुरू झाल्यानंतर बचत गटाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

पंढरी संचार

## महिला आयोगाच्या अध्यक्षांवरच अश्लील पोस्ट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रूपाली चाकणकर यांच्याविरोधात समाज माध्यमातून आक्षेपार्ह, अश्लील आणि अपमानास्पद पोस्ट केल्याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली होती. याप्रकरणी आकाश दिगंबर डाळवे (वय 30, रा. यावळे, ता. मोहोळ, जि. सोलापूर) याला मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. तर अविनाश बापू पुकळे (वय 30, रा. पारे कोकरेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर) याला उरळी कांचन, जि. पुणे येथून बेड्या ठोकण्यात आल्या.



## इयत्ता बारावी परीक्षा ; पहिल्याच पेपरला 186 विद्यार्थ्यांची दांडी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून इयत्ता बारावीच्या परीक्षा घेण्यास सुरुवात झाली आहे आज मंगळवारी 11 फेब्रुवारी रोजी इंग्रजीचा पहिला पेपर होता या पेपरला पंढरपूर तालुक्यातील 186 विद्यार्थी गैरहजर राहिले यामुळे विद्यार्थ्यांनी दांडी मारली असल्याचे दिसून आले आहे इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी पंढरपूर तालुक्यातून 7438 विद्यार्थी वसले होते यासाठी 19 परीक्षा केंद्रे तयार करण्यात आली होती इंग्रजीच्या पहिल्या पेपरला 7252 विद्यार्थ्यांनी हजेरी लावली तर 180 विद्यार्थी गैरहजर राहिले कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा व्हाव्यात म्हणून प्रशासनाने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत यामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पडली अशी माहिती गटशिक्षण अधिकारी मारुती लिगाडे यांनी दिली



**करमाळा** : येथील महात्मा गांधी विद्यालयाचे पर्यवेक्षक रमेश भोसले यांना सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचा 'विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४' मिळाला आहे. याबद्दल माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे त्यांचा सन्मान केला. पर्यवेक्षक भोसले यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी घेतलेले विशेष परिश्रम, विज्ञान विषयाची आवड निर्माण होण्यासाठी केलेल्या कामाची दखल घेत सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाने त्यांना आदर्श विज्ञान शिक्षक पूरस्कार दिला आहे.

### सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को.ऑप. असोसिएशन सोलापूर तर्फे देण्यात येणारा पुरस्कार

# 'आदर्श बँक पुरस्कार-२०२५'चा मर्चंट बँकेस प्रदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर** : सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को.ऑप. असोसिएशन सोलापूर तर्फे देण्यात येणारा यंदाचा आदर्श बैंक २०२५ पुरस्कार दि पंढरपूर मर्चेंट्स को-ऑप. लि., पंढरपूर बँकेला देण्यात आला. दि पंढरपूर मर्चेंट्स को-ऑप. लि., पंढरपूर या बँकेला ठेवी रुपये २०१ ते ५०० कोटी या वर्गवारीमध्ये तृतीय क्रमांकाचा आदर्श बैंक २०२५ पुरस्कार मिळाला. सोलापूर येथील हिराचंद नेमचंद वाचनालय, ॲम्फी थिएटरमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र स्टेट को. ऑप बँक फेडरेशन लि., मुंबईचे अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा यांच्या हस्ते व शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, शहर मध्य चे आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**पंढरपूर** : पंढरपूर येथील दि पंढरपूर मर्चंट को-ऑप. बँकेस आदर्श पुरस्कार सोलापूर येथील हिराचंद नेमचंद वाचनालय, ॲम्फी थिएटरमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र स्टेट को. ऑप बँक फेडरेशन लि., मुंबईचे अध्यक्ष श्री. अजय ब्रम्हेचा यांच्या हस्ते व शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख, शहर मध्य चे आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दि पंढरपूर मर्चेंट्स को-ऑप बँक लि., पंढरपूर बँकेने आजपर्यंत सर्वसामान्य सभासद व ग्राहकांना तत्पर सेवा व बँकिंग क्षेत्रातील सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे व ग्राहकांच्या नावलौकिकास पात्र ठरलेल्या या बँकेला आदर्श बैंक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को.ऑप. असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, सहकारी संस्था उपनिबंधक किरण गायकवाड, अस्मिता गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. बँकिंग क्षेत्रात काम करणाऱ्या बँकाच्या कामाची पोचपावती व त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून हा पुरस्कार देण्यात येतो.

यावेळी बोलताना श्री. अजय ब्रम्हेचा यांनी केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयामार्फत सहकारी बँकाकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच आरबीआयने सुद्धा सहकारी बँकांचा गुणात्मक दर्जा वाढल्याचे व सर्वसामान्य लोकांना आर्थिक पतपुरवठा करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम नागरी सहकारी बँकेने केले आहे असे सांगितले .तसेच नागरी सहकारी बँकाही सरकारी बँकांच्या बरोबरीने ग्राहकास विविध सेवा देत असलेबद्दल समाधान व्यक्त केले.

त्याप्रसंगी बँकेचे माजी चेअरमन श्री. नागेश आण्णासाहेब भोसले, माजी चेअरमन सोमनाथ सदाशिव डोंबे, बँकेचे उपाध्यक्ष श्री. वसंत धोंडीबा शिखरे संचालक श्री. राजेंद्र पवनलाल फडे, श्री. विजयकुमार रामचंद्र परदेशी, श्री. भगीरथ औदुंबर म्हमाने, श्री. संजय विठ्ठल जवंजाळ, श्री. राहुल पांडुरंग शिंदे नाईक, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षा सौ. मंजुश्री सुधीर भोसले, तज्ञ संचालक श्री. सुनिल गंगाधर मोहिते व्यवस्थापक श्री.अतुल महादेव म्हमाने, उपव्यवस्थापक श्री. रमेश नारायण कुलकर्णी व बँकेचे बहुसंख्य कर्मचारी उपस्थित होते.

## इंग्रजी पेपरला ४२ विद्यार्थ्यांनी केली कॉपी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : राज्यातील तीन हजार ३७३ परीक्षा केंद्रांवर बारावीतील जवळपास १६ लाख विद्यार्थ्यांचा पहिला इंग्रजीचा पेपर मंगळवारी (ता. ११) पार पडला. त्यात राज्य मंडळाच्या नऊपैकी सहा विभागातील ४२ विद्यार्थी पहिल्याच इंग्रजी पेपरमध्ये कॉपी करताना सापडले आहेत. त्यांच्यावर भरारी पथकांनी कारवाई केली आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी यंदा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने चोख नियोजन केले आहे. त्यामुळे परीक्षा सुरु होताच भरारी पथकाने शाळा तपासणी सुरु केली. त्यावेळी नऊ पैकी सहा विभागात ४२ विद्यार्थी कॉपी करताना भरारी पथकाच्या हाती लागले.

## Selected

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध

**सोलापूर :** मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या तीन वर्षांपासून रखडल्या आहेत. निवडणुका नसल्यामुळे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती, सदस्य, नगर परिषदांमधील नगराध्यक्ष, सदस्यच नसल्यामुळे सध्याच्या राजकीय परिस्थितीत आमदारांनंतर थेट सरपंचांनाच विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ओबीसी आरक्षणावर सुनावणी रखडल्यामुळे जिल्हा परिषदेसह महानगरपालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांना मुहूर्त सापडत नाही.

## गारमेंट पार्कसाठी खा. प्रणिती शिंदेंकडून पाठपुरावा



**सोलापूर :** सोलापुरात गारमेंट पार्क स्थापन करण्याचा मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या संदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्ली येथे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंग यांची भेट घेऊन पाठपुरावा केला आहे. सोलापुरात स्वतंत्र गारमेंट पार्क आणि सोलापूर चादरीच्या बनावटी करणाविरोधात कारवाई करण्याबाबतचे पत्र खासदार प्रणिती शिंदे यांनी सिंग यांना दिले आहे. या पत्रात म्हंटले आहे की, सोलापूर हे एक देशातील महत्त्वाचे वस्त्र उत्पादन केंद्र आहे. ते टिकून राहण्यासाठी येथे गारमेंट पार्क असणे गरजेचे आहे.

## जिल्ह्यातील ७१ हजार लाडक्या बहिणींकडे चारचाकी



**सोलापूर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात ११ लाख नऊ हजार ४८७ महिला लाभार्थी आहेत. त्यापैकी ७१ हजार महिलांच्या नावे चारचाकी वाहने असल्याची यादी राज्य स्तरावरून प्राप्त झाली आहे. राज्यातील दोन कोटी ५९ लाख लाडक्या बहिणींमध्ये सोलापूर जिल्ह्यातील ११ लाखांहून अधिक महिला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आहेत. त्यातील संजय गांधी निराधार योजना व नमो शक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या महिलांची नावे वगळली जात आहेत.

## कोणत्याही प्रमाणित कागदपत्रांशिवाय मतदार नोंदणी



**सोलापूर** : सुमारे ४८ लाख लोकसंख्येच्या सोलापूर जिल्ह्यात सध्या ३८ लाख ५० हजारांवर मतदार आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीपूर्वी जिल्ह्यात एक लाख ९२ हजार ३६ मतदार वाढले होते. दरम्यान, मतदार नोंदणी सर्वांसाठी खुली असून त्यावर जन्म व रहिवासी पुराव्यासंदर्भातील झेरॉक्स कागदपत्रे अपलोड केल्यावर मतदार नोंदणी होते. या पार्श्वभूमीवर ज्यांच्याकडे दोन्ही किंवा दोन्हीपैकी एक कागदपत्र नसल्यास तो दुसऱ्याच्या कागदपत्रावर स्वत:चे नाव टाकून त्याची झेरॉक्स अपलोड करूनही नाव नोंदवू शकतो, अशी स्थिती आहे.

## फिल्म सिटी येथे आमदार देशमुख यांची भेट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणुकीत जनतेने दिलेल्या जनादेशामुळे मोठा विजय प्राप्त करता आला. त्यामुळे या विजयाबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी सोलापूर शहर दक्षिणमधील वैष्णवी वूड्स, सोलापूर फिल्म सिटी येथे आमदार सुभाष देशमुख यांनी भेट देऊन नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. याप्रसंगी सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून, आगामी काळात या भागात अधिकाधिक विकासकामे गतीने पूर्ण केली जातील, याची ग्वाही दिली. यावेळी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्वाही...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अक्कलकोट** : अक्कलकोट रोड व होटगी रोड औद्योगिक वसाहतीमधील विविध सोयीसुविधांचा प्रश्न तसेच पाकणी येथील महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागेचा प्रश्न सोडवण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना दिली. आमदार कोठे यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी कोठे यांनी सोलापूर शहर विकासाच्या दृष्टीने विविध मुद्द्यांवर फडणवीस यांच्यासोबत चर्चा केली. यामध्ये प्रामुख्याने अक्कलकोट व होटगी रोड औद्योगिक वसाहतीमधील दर्जेदार सुविधा पुरवणे यांसारख्या विषयांचा समावेश होता.

## शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संस्थेचे प्राचार्य प्रा. भरत साठे, व प्रा. नितीन कंगळे, वसीम सय्यद, योगेश खरात, स्नेहा धाईंजे , तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री हर्षद घोंगडे, तुषार एकतपुरे आणि आशा खंडागळे उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रा. भरत साठे यांनी विद्यार्थ्यांना सहकार महर्षींच्या कार्याची महती सांगून मार्गदर्शन केले. तसेच, कार्यक्रमाच्या अखेरीस आभार व्यक्त करत स्नेहा धाईंजे त्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमामुळे महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या योगदानाची आठवण सर्वांमध्ये ताजी झाली आणि विद्यार्थ्यांना सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायक ठरले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## जावयाने सासूचे दात पाडल्याने दोघांविरुद्ध गुन्हा




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : कौटुंबिक वादातून सासूला मारहाण करून तीचे दात पाडल्या प्रकरणी जावयाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार 10 जानेवारीला सायंकाळी घडला. याबाबत गौराबाई सिद्राम आहेरवाडीकर ( वय 55, रा. एन. जी. मिल चाळ, सोलापूर ) यांच्या फिर्यादीवरून कलप्पा भीमराव पाटील, गणपत भीमराव पाटील ( रा. दर्गनहळळी, ता. दक्षिण सोलापूर ) या दोघांवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गौराबाई यांची मुलगी जयश्री हिच्याशी कलप्पा याचे भांडण सुरु असताना मध्ये पडलेल्या गौराबाई यांच्या तोंडावर मारून त्यांचे दात पाडले.

## जिल्ह्यातील 800 जेष्ठ नागरिक तीर्थ दर्शनाला रवाना



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील 800 ज्येष्ठ नागरिकांना ओरिसा येथील श्री जगन्नाथ पुरी दर्शनासाठी घेऊन जाणाऱ्या रेल्वे गाडीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर रेल्वे स्टेशन येथे फित कापून तसेच रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून या योजनेचा शुभारंभ केला. यानंतर ही गाडी पुरीकडे रवाना झाली. यावेळी समाजकल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

## कुरनूर धरणाच्या पाण्याने समर्थनगरची टंचाई मिटली



**अक्कलकोट :** गेल्या अनेक वर्षांपासून संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरलेल्या समर्थनगर अक्कलकोट ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामाला यश आल्याने अखेर कुरनूर धरणातील पाणी आता समर्थनगर येथील जलशुद्धीकरण केंद्रात दाखल झाले आहे.या पाण्याचे जलपूजन करण्यात आले. यावेळी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन, आनंद खजुर्गिकर, एम. बी. पाटील, घोडके, लंगोटे काका, बाबुराव रामदे, बनसोड, उपसरपंच लालसिंग राठोड, ग्रा. प. सदस्य मोनेश नरेगल, सतीश खराडे ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार, ग्रा पं कर्मचारी सचिन गिरबोने उपस्थित होते.




## डॉ. पाटील यांनी आरोग्यविषयक मुद्द्यांवर केले सखोल मार्गदर्शन

# शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये मुलींसाठी समुपदेशन व्याख्यान संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये, संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री.बी. आर.गायकवाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींसाठी विशेष समुपदेशन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थिनींना शैक्षणिक, व्यावसायिक आणि वैयक्तिक मार्गदर्शन प्रदान करणे होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संगीता पाटील या उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांनी भूषविले.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत प्राचार्य डॉ. आर.ए.देशमुख यांनी विद्यार्थिनींसाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे महत्त्व सांगितले आणि भविष्यात अधिक उपयुक्त उपक्रम राबवले जातील,असे सांगितले. कोमल पाटील मॅडम यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे डॉ.संगीता पाटील



मॅडम यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.संगीता पाटील मॅडम यांनी विद्यार्थिनींना करिअर संधी, मानसिक आरोग्य, तणाव व्यवस्थापन आणि आत्मविश्वास वाढीविषयी मार्गदर्शन केले. या वेळी मार्गदर्शकांनी राजमाता जिजाऊ, महाराणी ताराराणी, सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांसारख्या आदर्श महिलांच्या उदाहरणांचा संदर्भ देत, आत्मविश्वास व स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. तसेच इम्युनिटी, हिमोग्लोबिन (HB), हार्मोनल असंतुलन यांसारख्या आरोग्यविषयक मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या व्याख्यानात किशोरावस्थेत मुलींमध्ये होणाऱ्या शारीरिक आणि भावनिक बदलांवर चर्चा केली आणि हे बदल कसे व्यवस्थापित करावे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच करिअर ध्येये निश्चित करण्याचे आणि विविध क्षेत्रात मुलींसाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अडथळे आणि आव्हानांवर मात करून मुली त्यांचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान कसा वाढवू शकतात याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच या व्याख्यानात विद्यार्थिनींना आर्थिक स्वातंत्र्य, भावनिक स्वातंत्र्य आणि मानसिक आरोग्य या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींनी त्यांच्या शंकांचे निरसन करून व्याख्यानाचा लाभ घेतला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख, सर्व महिला शिक्षिका यांच्यासह समन्वयक म्हणून प्रा. श्रीया कुलकर्णी व प्रा. कोमल पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीया कुलकर्णी व आभारप्रदर्शन कोमल पाटील यांनी केले.

पंढरी संचार

**सोलापूर :** बहुचर्चित सोलापूर-गोवा, सोलापूर-पुणे, सोलापूर-मुंबई या मार्गावरून विमान सेवा सुरू होण्यास अजूनही मूहूर्त लागत नाही. होटगी रोड विमानतळ परिसरातील परिस्थितीमुळे ७२ आसन क्षमता असलेल्या विमान सेवेला परवानगी मिळाली असली तरी प्रत्यक्षात ५५ ते ६० प्रवाशांना प्रवास करण्यास परवानगी असेल अशी माहिती प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.

### निष्ठावंतांना मिळणार न्याय

# ना. फडणवीस व पद्मजादेवी मोहिते पाटील यांची बंद दाराआड चर्चा

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** राज्याचे मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस व सोलापूर विद्यापीठ उच्च शिक्षण संस्था चालक संघटनेच्या अध्यक्षा ,सिनेट सदस्या पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते पाटील यांची मंगळवार दि 11 फेब्रुवारी रोजी सायंकाळी मुंबई येथे बैठक संपन्न झाली असून या बैठकीसाठी माळशिरसचे मा आ राम सातपुते यांच्यासह उर्वशीराजे मोहिते पाटील याही उपस्थित होत्या जवळपास 40 मिनिटे बंद दाराआड चाललेल्या या बैठकीत सोलापूर जिल्ह्यासह माळशिरस तालुक्यातील विविध विषयांवर सखोल चर्चा झाल्याची माहिती दिली.

माळशिरसचे मा आ राम सातपुते यांनी भाजपाचे विधान परिषदेचे आ रणजितसिंह मोहिते पाटील यांना भाजपा मधून बडतर्फ करण्याची मागणी केल्यानंतर भाजपाकडून काय कारवाई होत आहे याकडे लक्ष असतानाच काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदाचा तडकाफडकी राजीनामा दिलेले डॉ धवलसिंह मोहिते पाटील यांच्या मातोश्री व महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार राज्यमंत्री लोकनेते स्व प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या पत्नी पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी आपल्या सुनबाई उर्वशीराजे मोहिते पाटील यांच्यासह मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट व यामध्ये विविध विषयांवर झालेली चर्चा महत्त्वपूर्ण मानली जात आहे . माळशिरस तालुक्यात अडचणीत आलेल्या विविध सहकारी संस्था त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना जिल्ह्याच्या व माळशिरस तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अल्पावधीतच अनेक योजना जिल्हासह तालुक्यात कार्यान्वित होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस साहेब हे लवकरच माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत त्यांचा तालुक्याच्या वतीने अकलूज येथे नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार असून यावेळी माळशिरस तालुक्यातील विविध विकास कामांचे उद्घाटन ही होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पद्मजादेवी मोहिते पाटील यांची भेट व बंद दाराआड झालेली चर्चा ही डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरविणारी असेल असेही बोलले जात आहे.

**"जुन्या आठवणींना उजाळा"**

या भेटी प्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री यांनी लोकनेते स्व प्रतापसिंह मोहिते पाटील यांचे तत्कालीन सोलापूर लोकसभा निवडणुकीतील प्रसंग, सन 2013 साली अकलूज येथील शेतकरी मेळाव्यातील तत्कालीन भाजपा अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांचे भाषण, जनसेवा संघटनेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिरासह अकलूज येथील प्रतापगडावरील आठवणींना उजाळा देऊन जनसेवा संघटनेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

## नोकरीचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** उत्तर सोलापुरातील एका संस्थेत नोकरीचे आमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याची घटना सोलापुरात घडली आहे. याप्रकरणी प्रदीप सोहालाल शिंगवी (रा. मंगळवार पेठ, सोलापूर ) रेखा गुप्ता, शिलवंती बिराजदार ( दोघी रा. सोलापूर ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. प्रदीप शिंगवी याने पीडित महिलेला नोकरीचे नियुक्ती पत्र हवे असेल तर मी म्हणेल तसे करावे लागेल असे म्हणत तिच्यावर 18 नोव्हेंबर व 25 नोव्हेंबर 2024 रोजी अत्याचार केला. त्यामुळे तिघांवर अत्याचार व अॅट्रॉसिटी अंतर्गत तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

» पान १ वरुन

## विठ्ठलच्या माजी ५५ संचालकांना...

२०१५-१६ व सन २०१६-१७ या सालात संचालक मंडळाने मनमानी कारभार करून ऊसतोड ठेकेदार व वाहतूक ठेकेदार यांना व काही शेतकऱ्यांना १० कोटी ४७ लाख रुपयांचे वाटप केले असल्याचे दिसून आले आहे. यामुळे लेखा अधिकारी यांनी कारखान्याचे माजी ५५ संचालक व १५ अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. पंधरा दिवसात याचे उत्तर देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे आता कारखान्याचे चेअरमन आमदार अभिजीत पाटील कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## प्रवाशांचा कल खाजगी ...

वळविल्याचे दिसून येत आहे. भाडेवाढीचा सर्वाधिक परिणाम नियमित प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्गावर होत आहे. त्याचबरोबर शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, गावाकडे जाणारे स्थलांतरित कामगार आणि पर्यटन व देवदर्शनासाठी प्रवास करणारे नागरिक यांनाही या भाडेवाढीचा मोठा फटका बसत आहे. कुटुंबासह प्रवास करणाऱ्यांना जास्त खर्च करावा लागणार असून, विद्यार्थ्यांच्या पालकांवर अतिरिक्त आर्थिक ताण येत आहे. यासह आगामी उन्हाळ्याच्या सुट्टीच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असताना एसटी महामंडळाने तिकीट दरात 15 टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. उन्हाळी हंगामात एसटी प्रवाशांची संख्या लक्षणीयरीत्या वाढते. शालेय-महाविद्यालयीन सुट्या, कौटुंबिक भेटी, पर्यटन आणि देवदर्शन यांसाठी नागरिक मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. अशा परिस्थितीत भाडेवाढीचा निर्णय प्रवाशांसाठी अतिरिक्त आर्थिक बोजा ठरणार आहे.

» Selected

## प्रधानमंत्री सूर्य घर योजनेची प्रभावी अंमलबजावणी

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात पीएम सूर्य घर योजना अंमलबजावणीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा 300 युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करणे आहे. सोलापूर जिल्ह्यात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वीज वितरण कंपनीला योग्य नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. वीज वितरण कंपनीकडून ही योजना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन केले जात आहे.

## शेतकऱ्याचे प्रश्न मार्गी लावा; मा.आ. राम सातपुते यांनी घेतली भेट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माजी आमदार राम सातपुते यांनी भेट घेतली. माळशिरस विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे विविध प्रश्न मार्गी लावा या संदर्भात मंत्र्यांना निवेदनही दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व प्रश्न मार्गी लावू असे आश्वासनही विखे पाटील यांनी दिली आहे. उत्तम जानकर यांनी बॅलेट पेपरला आव्हान दिल्यापासून महाराष्ट्रातील सर्वाधिक चर्चेला जाणारा मतदारसंघ म्हणून माळशिरस ओळखला जातो. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे जे कांही प्रश्न असतील ते लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांनी दिले.

## सकारात्मक...

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**सोलापूर :** सोलापूरच्या आयटी उद्योजकांच्या समस्यांसंदर्भात आणि आयटी क्षेत्राच्या विकासासाठी सोलापूर आयटी असोसिएशनच्या प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांची भेट घेतली. या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद देत, संबंधित सर्व शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले. जिल्हाधिकाऱ्यां सोबतच्या बैठकीत सोलापूर आयटी असोसिएशनचे माऊली झांबरे, जयंत होल्हे पाटील, रोहन फुरडे, अपूर्व जाधव, संतोष गवळी, विजय कुंदन जाधव आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.

## मोहोळ पंचायत समितीचा संघ उपविजेता



**मोहोळ :** मोहोळ सोलापूर जिल्हा परिषद अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी क्रीडा स्पर्धेमध्ये मोहोळ पंचायत समितीने यंदा सांघिक ५ तर वैयक्तिक मध्ये १६ अशी २१ पारितोषिके मिळवून सलग पाचव्यांदा सर्वसाधारण उपविजेते पद पटकावले आहे. मैदानी व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध गुणदर्शन कार्यक्रमात मोहोळ पंचायत समितीमधील कर्मचा-यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये ११ तालुक्यातील सर्व क्रीडा प्रकारातील ११ संघ तसेच मुख्यालयाचा एक असे १२ संघांमध्ये स्पर्धा झाल्या.

## हातचलाखीने पैसे पळविणाऱ्याला घेतले ताब्यात



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नातेपुते :** बँक खात्यातून काढलेले पैसे मोजत असताना एका अनोळखी इसमाने महिलेच्या हातातील १३,५०० रुपये हातचलाखीने पळविले. ही घटना बँक ऑफ इंडिया शाखा नातेपुते याठिकाणी घडली. घटनेची माहिती मिळताच नातेपुते पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या चार तासांत आरोपीला ताब्यात घेतले. याबाबत रेखा संतोष मोहिते (वय ४०) यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी संशयित आरोपी सरफराज मानू इराणी (वय ४३, राहणार सय्यद नगर, पुणे) याला नातेपुते पोलिसांनी अटक केली आहे.

## दसुर गावच्या कु. सोनिया कागदे यांची महसूल सहाय्यक पदावर निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**करमाळा :** दसुर (ता. माळशिरस) येथील कु. सोनिया शरद कागदे यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून मसूल अधिकारी (महसूल सहाय्यक) पदावर निवड मिळवली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे यश निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

कु. सोनिया यांनी SVERI's अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर येथून संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकीची पदवी घेतली. उच्च शिक्षण घेत असतानाच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली. अभ्यासातील सातत्य, कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल कागदे परिवार, ग्रामस्थ दसुर व SVERI परिवार यांनी आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या यशामुळे गावातील अनेक तरुणांना प्रेरणा मिळणार आहे.

"स्वप्न मोठी असली की संघर्षही मोठा असतो, पण जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते," असे कु. सोनिया यांनी सांगितले. त्यांनी आपले यश आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक आणि स्वतःच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना समर्पित केले आहे. त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी अनेक शुभेच्छा!

## चळे येथे महिलांसाठी आरोग्य शिबीर संपन्न



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग यांच्या वतीने चळे ग्रामपंचायत येथे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्या मध्ये महिलांचे रक्त तपासणी करून त्यामध्ये कमी आसलेल्या घटकांची कमतरता पूर्ण करण्यासाठी माहिती पत्रक देऊन जण जागृती अभियान राबविण्यात आले. या आरोग्य तपासणीस महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबिरासाठी प्रमुख पाहुणे चळे गावचे विद्यमान सरपंच ज्ञानेश्वर शिखरे हे उपस्थिती होते. या तसेच पंढरपूर महाविद्यालय चे आजी,माजी विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी चळे गावचे माजी विद्यार्थी सोमनाथ सुदाम मोरे यांचे विशेष सहकार्य लाभले तर कार्यकमाचे आभार प्रदर्शन ग्रामपंचायत कर्मचारी अतुल सटाले यांनी केले.

## हिंदु वीरशैव लिंगायत मंचाचे अतिरीक्त आयुक्तांना निवेदन



**सोलापूर :** सोलापूर शहरातील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर सभोवतालच्या तलावातील अस्वच्छतेच्या बाबत हिंदू वीरशैव लिंगायत मंचाच्या वतीने चर्चा करून मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना निवेदन देण्यात आले. लक्ष्मी मंडई समोरील सार्वजनिक शौचालय व विष्णू घाटा प्रवेशद्वार समोरील घाणीने वेढलेली कचराकुंडी पूर्णपणे तात्काळ बंद करून ते तिथून हटवण्यात यावे. तसेच पासपोर्ट कार्यालय ते निर्मलकुमार फडकुले सभागृह या भागाकडील तलावात होणाऱ्या सांडपाण्याचा प्रवाह बंद करून त्या मुख्य ड्रेनेज लाईनला जोडण्याची मागणी करण्यात आली आहे.




### श्री.महेश आवताडे यांचा प्रामाणिकपणा बद्दल

## पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन यांचे हस्ते सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** भटुंबरे येथील सौ.सुनिता लक्ष्मण खांडेकर या लॉकर्स कामानिमीत्त मंगळवारी पंढरपूर अर्बन बँकेचे खवाबाजार येथे आल्या होत्या. बँकेतील काम आटोपून जाताना त्यांची बँकेची लॉकर्स किल्ली, रोख रक्कम व मौल्यवान वस्तू असणारी पर्स त्यांचेकडून हरविले गेलेचे त्यांना घरी गेल्यावर लक्षात आले.

दरम्यान, बँकेनजीक भादुले चौक येथे सिंहगड कॉलेज येथील कर्मचारी श्री.महेश ज्ञानेश्वर आवताडे रा.गोविंदपुरा यांना सदर पर्स सायंकाळी सहा वाजताचे दरम्यान रस्त्यावर पडलेली सापडली. त्यांनी पर्समधील लॉकर्स की बँकेची असल्याचे कळल्यावर तत्काळ बँकेचे चेअरमन श्री.सतीश मुळे यांचेशी संपर्क साधला. सदर लॉकर्स की वरून बँकेचे कर्मचारी श्री.व्यंकटेश मुळे यांनी सौ.खांडेकर यांचे पत्यावर त्यांचेशी संपर्क करून बँकेची किल्ली व पर्स सुरक्षित असल्याची माहिती दिली.

श्री. महेश आवताडे यांनी दाखविलेला प्रामाणिकपणा बद्दल पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन श्री.सतीशजी मुळे यांनी कौतुक करीत त्यांचा सत्कार केला.

यावेळी सौ. सुनिता खांडेकर, बँकेचे संचालक श्री. प्रभुलिंग भिंगे, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, व्यवस्थापक श्री.गणेश हरिदास, श्री.व्यंकटेश मुळे आदी कर्मचारी वर्ग उपस्थित होता. सदर पर्स व त्यावरील सर्व मौल्यवान वस्तू पाहताच सौ.खांडेकर आज्जींनी समाधान व्यक्त करीत श्री.महेश आवताडे यांचे आभार मानले. याप्रसंगी बँकेतील कर्मचारी उपस्थित होते.

संपादकीय विशेष

# व्यथा सामाजिक कार्यकर्त्यांची

सामाजिक काम करणाऱ्यांसाठी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आमटे यांनी सामाजिक जाणीवेची, समाजभान जागृत करण्याची मोठी नीव रचली आणि त्यांचा अनुनय करत आज विविध क्षेत्रांमध्ये काम करणारे ती धुरा समर्थपणे पेलत आहेत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन एक पिढी घडली आणि आजही घडत आहे. मात्र सामाजिक कार्यकर्ते घडवण्यात आता आपली व्यवस्था कमी पडत आहे का, मस्साजोग हत्त्याकांडासारख्या घटनेमुळे ते नाउमेद होत आहेत का, आपण कितीही संघर्ष केला तरी समाज आपल्याला कसे स्विकारतो हा विचार त्यांना व्यथित करतो का यासारखे अनेक प्रश्न निर्माण होतात. म्हणूनच बाबा आमटे यांचे पुण्यस्मरण करताना या चर्चेला तोंड फोडणे गरजेचे ठरते. इथे लक्षात घ्यायला हवे की सामाजिक संस्थांना कायमच काम राहिलेले आहे.

बाबा आमटे यांच्या काळातील सामाजिक प्रश्न कदाचित वेगळे असतील. म्हणूनच त्यांना कुष्ठरोग्यांसाठी काम करावे लागले. आताचे प्रश्न वेगळे आहेत. मात्र आरोग्य, शिक्षण, पर्यावरण यासारखे मुद्दे तेव्हाही होते आणि आजही आहेत. स्वाभाविकच आजही या क्षेत्रांमध्ये काम करण्यास भरपूर वाव असून त्यासाठी अनेक संस्था काम करु इच्छितात. मात्र त्यांना पोषक वातावरण आहे का आणि कार्यकर्त्यांची तेवढी फौज उभी करणे आत्ता शक्य आहे का, हे कळीचे मुद्दे आहेत आणि तेच सर्वामोठे आव्हानही आहे.

पोषक वातावरणाबाबत बोलताना दोन-तीन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. एक म्हणजे सरकार दरबारचे पोषक वातावरण महत्त्वपूर्ण असते. मात्र प्रत्यक्षात सरकार दरबारी सामाजिक संस्था, एनजीओ यांच्याबाबत काही प्रमाणात नकारात्मक दृष्टीकोन आहे तर काही प्रमाणात आकसही आहे. एक वेळ याबाबत सरकारची तटस्थ भूमिकाही परवडते, पण आकसी दृष्टीकोन मात्र पोषक ठरत नाही. उलटपक्षी, तो दृष्टीकोन सामाजिक कार्यात येऊ पाहणाऱ्यांना नाउमेद करतो. सुदैवाने बाबा आमटे यांच्या काळात तो नव्हता. मात्र आताच्या काळात तो निर्माण झाला आहे.

परिणामस्वरुप या सगळ्या संस्था लबाड आहेत, त्या सरकारविरोधात काम करण्याचा प्रयत्न करतात, समाजाच्या प्रश्नांवर काम करताना सरकार कमी पडतेय, हेच दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो असा समज राज्यकर्त्यांनी करुन घेतला आहे. खरे तर तो अत्यंत चुकीचा आहे, पण हीच वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांचा अधिकाधिक वेळ कार्यालयीन कामकाजात कसा जाईल आणि त्यांना सामाजिक कार्यासाठी कमीत कमी वेळ कसा मिळेल, हे पाहण्याचे काम सरकारकडून होते. अगदी छोटी उदाहरणे हे स्पष्ट करतील.

आपल्याकडे धर्मादाय आयुक्त नामक यंत्रणा आहे. तिथे सर्व सामाजिक संस्थांना नोंदणी करावी लागते. मात्र तेथील नियम इतके क्लिष्ट करुन ठेवले आहेत, सामाजिक संस्थांना त्यांच्याकडे इतक्या बारीकसारिक गोष्टी द्याव्या लागतात की, त्यातच संस्थांचा बराच वेळ खर्च होतो. केवळ हे करुन उपयोग नसतो तर वेळेच्या मर्यादा पाळतानाही मोठी दमछाक होते. खेरीज काही बाबी तर आपल्या आकलनाच्या बाहेर जातात. जसे की, संस्थांना प्रथम त्यांचे ऑडिट ऑनलाईन भरावे लागते. विषय तिथे संपत नाही. पुन्हा हेच सगळे तपशील ऑफलाईनही भरावे लागतात. ते जमा करुन सही-शिक्के घ्यावे लागतात.

दोन वर्षांनी वेळ पडली तर ते या सगळ्या गोष्टी आपल्याकडूनच मागवतात, कारण त्यांच्याकडे काहीच सापडत नाही. ही खरी स्थिती आहे. इथे ऑनलाईनचा आग्रह धरताना ऑफलाईनची गरज का, या प्रश्नाचे उत्तर मात्र कोणीही देत नाही. हीच अवस्था आयकर विभागाची आहे. खरे तर हे लोक, संस्था सरकारला पूरक काम करत असतात. सरकार पोहोचू शकत नसलेल्या ठिकाणी त्या पोहोचतात. असे असताना त्यांना थेट मदत केली नाही तरी चालेल पण अप्रत्यक्ष मदत केली तरी पुरेशी ठरेल. आता कार्यकर्त्यांची फौज उभी करण्याचे कामही कठीण होताना दिसत आहे. एक तर आता सगळेच पोटार्थी झाले आहेत. स्वत:पुरते बघण्याची व्यवस्था निर्माण झाली असताना लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजणार आणि हे काम केले तर माझे पोट कशावर भरणार हा प्रश्न उभा राहतो. त्यामुळेही अनेकजण आवड असूनही या कामाला पूर्ण वेळ देत नाहीत. असे काम करण्याची धडपड, तळमळ आणि इच्छा असणारी एक पिढी आधी होती. त्यातील काहीजण अर्थवेळ काम करत असत. मुख्य म्हणजे त्यांच्या गरजा कमी होत्या. मात्र आताच्या संस्कृतीमध्ये माणसांच्या गरजा प्रचंड वाढल्या आहेत. त्या पुरवतानाच लोकांची दमछाक होत आहे. त्यामुळेही अनेकांना या सगळ्याकडे बघायला, वळायला वेळ नाही.

सध्या या सगळ्या सामाजिक संस्थांवर वेगळ्या प्रकारचा दबावही वाढत आहे. विशेषत: तो सोशल मीडियामधून वाढत आहे. चांगले काम केले असले तरी काही गट त्यांच्यावर जाणीवपूर्वक टीका करतात, संशय व्यक्त करतात. हे सरकारधार्जिणे गट सरकारचीच 'री' ओढत संस्था चुकीचे काम करत असल्याचे पसरवतात. ट्रोलगच्या माध्यमातून हे काम रितसर केले जाते. यांना काही काम नाही, यांचा दृष्टीकोनच नकारात्मक आहे, कशाला नसत्या गोष्टींच्या मागे लागता.. असे भाष्य सामाजिक काम करु पाहणाऱ्या कोणालाही निश्चितच मागे खेचू शकते. काळजीची बाब म्हणजे हे सर्व सुनियोजित पद्धतीने होत आहे. त्यामुळेही अनेकांचा उत्साह संपतो, धीर खचतो आणि कार्यकर्त्यांचे बळ कमी होते. बाबा आमटे यांना समाजाने तरी उचलून धरले. पुलंसारख्या व्यक्तीकडून धीर देण्याचे काम झाल्याने त्यांना एक प्रकारे प्रोत्साहनही मिळाले. समाजातील जाणकार मंडळींची साथ त्यांना मिळाली. आज तसेही होताना दिसत नाही. जाणकार वा प्रतिष्ठित मंडळी एक तर गप्प आहेत. ते काहीच करायला तयार नाहीत. दुसरीकडे, ट्रोलग करणारी मंडळी या क्षेत्रातील लोकांना नामोहरम करण्याच्या जोरकस प्रयत्नात आहेत. अशा सगळ्या म्हणजे एका बाजूने सामाजिक, दुसरीकडून सरकारी तर तिसरीकडून सोशल मीडियाकडून वाढणारे संकट बघता सगळ्यावर मात करत सामाजिक संस्था उभ्या करणे, मोठ्या करणे, चालवणे खरेचच अवघड होऊन बसले आहे. कदाचित येत्या काळात या प्रकारच्या सामाजिक चळवळी भग लावूनच शोधाव्या लागतील. ही बाब निराशाजनक वातावरण निर्माण करणारी आहे. अर्थात असे असले तरी माणसाच्या मनात अंतर्गत इच्छा असतेच. आपल्याला काही तरी करायचे आहे, असे अनेकांना वाटत असते. त्यातून हे क्षेत्र फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेईल, अशी खात्री आहे.

# इथेनॉलचा पर्याय फायदेशीर ठरणार?

**पेट्रोल आणि डिझेलसारख्या इंधनांना पर्याय म्हणून ऊस आणि मक्यासारख्या शेतमालापासून उत्पादित केलेले इथेनॉल हे महत्वाचे उत्पादन आहे. पण उत्पादनासाठी लागणारे प्रचंड पाणी आणि भविष्यकाळात फक्त ठराविक शेतमाल उत्पादित केल्यामुळे निर्माण होणाऱ्या महागाईमुळे इथेनॉल कितपत किफायतशीर ठरेल, ही शंका आहे. या पार्श्वभूमीवर कृषि अर्थकारणावर प्रभाव टाकणाऱ्या या घटकाचा घेतलेला आढावा.**

कृषि अर्थकारण

शंतनु चिंचाळकर

टोयोटा किर्लोस्कर मोटरने विकसित केलेल्या ६ स्टेज 'इलेक्ट्रीफाइड फ्लेक्स फ्युएल व्हेईकल'चे जगातील पहिल्या प्रोटोटाईप मिंट सस्टेनेबिलिटी समिटदरम्यान अनावरण झाले. प्रोटोटाईप हा टोयोटाच्या इनोव्हा कारचा एक नाविन्यपूर्ण प्रकार आहे. ऊसामध्ये असणाऱ्या इथेनॉलच्या क्षमतेमुळे शेतकरी आता अधिकाधिक उसाची पेरणी करत आहेत आणि भारतातील शेतकऱ्यांसाठी उसाद्वारे इथेनॉल निर्मिती हे वरदान ठरणार आहे.

देशातील मोटार उत्पादक कंपन्यांकडून पुढील सहा महिन्यांमध्ये शंभर टक्के बायोइथेनॉलवर चालणाऱ्या मोटारी सादर करण्यात येणार आहेत. बायोइथेनॉलवरील दुचाकीही लवकरच बाजारात दाखल होतील. ह्युंदाई, महिंद्रा, टाटा आणि सुझुकी या चार कंपन्या शंभर टक्के बायोइथेनॉलवर चालणाऱ्या मोटारी सादर करतील. तर आगामी काळात बजाज, टीव्हीएस, होंडा, हिरो या कंपन्या शंभर टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या स्कूटर बाजारात आणणार आहेत. पूर्णपणे बायोइथेनॉलवर चालणारी वाहने आल्यानंतर अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल.

जिल्ह्यामधल्या ज्या ज्या तालुक्यात साखर कारखाना असेल, तिथे इथेनॉल निर्मिती होईल. देशात पेट्रोलची कमतरता वाढणार आहे आणि इथेनॉल पेट्रोलला पर्याय ठरणार आहे. यामुळे आता इंडियन ऑइल कंपनी महाराष्ट्र, कर्नाटक आणि तमिळनाडूमध्ये इथेनॉलचे ४०० पंप सुरू करणार आहे. तसेच आता पाच कंपन्या इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या आणणार आहेत. यामुळे बहुतेक वाहनधारकांनी इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या वापरल्या तर उसापासून बनणाऱ्या इथेनॉलचा वापर वाढणार आहे. तसेच मक्यापासून इथेनॉलनिर्मिती करता येते त्यामुळे भविष्यकाळात मक्यालाही चांगला भाव मिळेल. त्यामुळे इथेनॉलच्या गाड्या वापरल्यास शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. एक लिटर इथेनॉलची किंमत ६० रुपये आहे, तर पेट्रोलचा दर १०५ रुपयांच्या आसपास आहे. त्यामुळे पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचा विचार केल्यास प्रवासाचा खर्च अर्ध्यावर येईल. त्यामुळे येत्या काळात जास्तीत जास्त वाहने इथेनॉलवर चालवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक आहेत.

अल्टरनेट फ्यूएल म्हणजे पर्यायी म्हणून उपलब्ध असलेले इंधन अत्यंत स्वस्त आहे. इलेक्ट्रिक एनर्जी पर्यायही स्वस्त आहे. त्याचे शुल्क प्रति युनिट २ रुपये ८० पैसे आहे. डिझेलवर चालणाऱ्या बसचा खर्च प्रति किलोमीटर ११५ रुपये इतका आहे तर एसीशिवाय चालणाऱ्या इलेक्ट्रिक बसचा खर्च 39 रुपये प्रति किमी आहे. एसी बसचा खर्च ४१ रुपये प्रति किमी आहे. परंतु ही किंमत सबसिडी दिल्यानंतरची आहे. त्याचा मूळचा खर्च ६१ रुपये प्रति किलोमीटर इतका आहे. इथेनॉलवर चालणाऱ्या कारची पेट्रोलवर चालणाऱ्या कारशी तुलना केली तर प्रति किलोमीटर २५ रुपयांची बचत होऊ शकते. याशिवाय केंद्र सरकार लोकांना जुनी वाहने स्क्रॅप करण्यासाठी सातत्याने आवाहन करत आहे. यासाठी किंमतीवर आणि जीएसटीवर सूट यासारख्या गोष्टींवर अधिक भर देत आहेत. आता कंपन्या नवीन कार खरेदीवर १.५ टक्के ते ३.५ टक्के सूट देत आहेत. परंतु ही सवलत तुमची जुनी कार स्क्रॅप कराल, तेव्हाच ही सवलत मिळेल. लक्झरी कार बनवणाऱ्या काही कंपन्या तर २५ हजार रुपयांपर्यंत सूट देत आहेत. वीज आणि जैवइंधन यांच्या संयोगावर चालणाऱ्या इंजिनमध्ये इथेनॉल वापरले जाते. वनस्पती-व्युत्पन्न जैवइंधन '१००' म्हणून ओळखले जाते. हा दृष्टीकोन ऑटोमोटिव्ह क्षेत्रात पर्यायी आणि पर्यावरणपूरक इंधनाचा अवलंब करण्याच्या भारताच्या सततच्या प्रयत्नांशी सुसंगत आहे.



इथेनॉल इंधन तसेच कॉर्न किंवा ऊसासारख्या पिकांपासून मिळवलेले इंधन हे पारंपारिक जीवाश्म इंधनासाठी वैध पर्याय ठरते. उत्सर्जनाची कमी पातळी आणि तेलावरील कमी अवलंबित्व ही त्यांच्या लोकप्रियतेची ठळक कारणे आहेत. ऑटोमोटिव्ह क्षेत्रामध्ये विविध इथेनॉल मिश्रणे, अलग उत्पादन पद्धती आणि आधुनिक ऊर्जा यांचे विस्तृत अनुप्रयोग समाविष्ट केले जात आहेत. तथापि, तेल व्यवसायात गुंतलेल्या लोकांकडून इथेनॉलवर नेहमीच टीका केली जाते आणि या प्रकारच्या इंधनाविषयी अफवा पसरवणे आणि खोटे बोलणे या गोष्टी केल्या जात आहेत. २०२५ च्या उत्तरार्धापर्यंत इथेनॉल निर्मिती आणि त्याचा परिणामकारक वापर होऊन अपेक्षित लक्ष्य गाठले तर सरकारच्या ३० हजार कोटी रुपयांच्या परकी चलनात बचत होईल. मात्र ते शक्य आहे का? इथेनॉलचा दर पेट्रोल आणि डिझेलएवढा नसला तरी भविष्यात वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये साखर कारखानदारांनी इथेनॉलची किंमत वाढवण्याची मागणी केली. दरवाढ न केल्यास या क्षेत्रात त्यांचा उत्साह राहणार नाही, असे संकेत दिले गेले.

यूएसडी ॲनालिटिक्सच्या संशोधन अहवालानुसार, जागतिक इथेनॉल बाजार 2023-2030 च्या काळात 4.20 टक्के वार्षिक चक्रवाढीच्या दराने वाढेल आणि अशा स्थितीत स्थानिक निर्माते इथेनॉलची निर्यात वाढवण्यासाठी उत्सुक राहतील. ते रोखल्याशिवाय देशांतर्गत मागणी पूर्ण होणार नाही. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अधिक इथेनॉल उत्पादन करण्याचा अर्थ म्हणजे इथेनॉलसाठी पूरक असणारे पीक घेणे. साहजिकच खाद्यान्नांच्या उत्पादनात घट होऊन त्यांच्या किंमती वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

आज महाराष्ट्रासारख्या राज्यात उसातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे पर्जन्यटंचाई असणाऱ्या भागातील शेतकरीही ऊस लागवडीकडे वळताना दिसत आहेत. भविष्यात इथेनॉलची अर्थव्यवस्था आकाराला येईल तेव्हा हे प्रमाण आणखी वाढताना दिसेल. ऊस शेतीबाबत कुणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही; मात्र उसासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. इथेनॉलला हरित इंधन म्हटले जात असले तरी एक लिटर इथेनॉलसाठी सुमारे तीन हजार लिटर पाणी लागते हे वास्तव आहे. आपल्याकडे अनेक भागात भूगर्भातील पाण्याचा उपसा करून ऊसशेती पिकवली जाते. त्यामुळे या पाण्याचे मोल विचारात घेऊन इथेनॉलचे मूल्य किफायतशीर आणि पर्यावरणपूरक आहे का याचा विचार केला गेला पाहिजे. शुद्ध इथेनॉल आपल्या परिसरात असलेले पाणी वेगाने शोषून घेते, या बाबीकडेदेखील लक्ष द्यावे लागेल. गेल्या सहा-सात वर्षांमध्ये महाराष्ट्राला आणि देशाला दुष्काळाला सामोरे जावे लागलेले नाही; परंतु भविष्यकाळात दुष्काळाचा फेरा आला तर इथेनॉलनिर्मितीसाठी आवश्यक असणारा ऊस पिकवण्यासाठी पाणी कोठून आणायचे हा प्रश्न निर्माण होईल. त्यातून सामाजिक संघर्ष उद्भवण्याच्या शक्यता नाकारता येणार नाहीत.

दुसरीकडे, उसाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढत गेल्यास डाळी, कडधान्ये, तेलबिया यांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होईल. त्यांची आयात करण्यावाचून पर्याय राहणार नाही. कारण त्यांच्या टंचाईचा आणि दरवाढीचा लोकजीवनाशी थेट संबंध आहे. म्हणजे तेलाच्या आयातीतील पैसा वाचवायचा आणि या पिकांच्या आयातीवर खर्च करायचा अशी स्थिती तर उद्भवणार नाही ना, याचा विचार व्हायला हवा. त्यामुळे संपूर्ण इथेनॉलवरील गाड्या व्यावहारिक पातळीवर आणताना सकारात्मक बाजूंबरोबरच या काही संभाव्य शक्यतांचाही विचार केला गेला पाहिजे. तसा तो झाल्यास वाढू शकणारी इथेनॉलप्रभावित अर्थव्यवस्था आकार घेऊ शकेल आणि ती शेतकरीवर्गासाठी फायदेशीर ठरु शकेल. मात्र तसे करताना वर नमूद केलेले मुद्दे लक्षात घ्यावे लागणार आहेत. विकासाच्या वाटेवर चालताना अडथळे यायचेच, पण अडथळे नव्या समस्या निर्माण करणारे असू नयेत. त्या दृष्टीने पाहता, इथेनॉलआधारीत अर्थव्यवस्था आकाराला यावी, मात्र विविध मर्यादा लक्षात घ्यायला हव्यात.

# 'पीफ' महोत्सव : चित्रपट रसिकांसाठी पर्वणी

मनोरंजन

सागर बाबर
मिडिया कमिटी, पुणें

पुण्यासारख्या सांस्कृतिक राजधानीत २३ वे वर्ष साजरे करणाऱ्या पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने निश्चितच मोठे योगदान दिले आहे. पुण्याप्रमाणेच मुंबई, नागपूर, चंद्रपूर, संभाजीनगर, लातूर, अशा शहरी व निमशहरी भागातही स्यातेलाईत चित्रपट महोत्सव आयोजित करून पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने देशी विदेशी जागतिक दर्जाचे चित्रपट बघण्याची संधी तेथील चित्रपट रसिकांना दिली आहे. हे निश्चितच भूषणास्पद बाब आहे.

सन २००२ मध्येच सुरु झालेल्या पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाने अल्पावधीतच केरळ, दिल्ली, कलकत्ता, या प्रमाणेच कांस, बर्लिन, न्यूयोर्क, लंडन अशा अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांच्या रांगेत स्वतःचे स्थान निर्माण केले. सन २००९ पासून महाराष्ट्र सरकारचा हा अधिकृत चित्रपट महोत्सव बनला. पुणे फिल्म्स फौंडेशन महाराष्ट्र सरकारचा सांस्कृतिक विभाग, आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले जाते. प्रख्यात दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांच्या कुशल मार्गदर्शनामुळेच हा चित्रपट महोत्सव रसिकांच्या मनातील ताईत बनला आहे.

या महोत्सवात जागतिक स्पर्धा विभाग व मराठी चित्रपट स्पर्धा विभाग असून जगभारातून १५०० हून अधिक अंतरराष्ट्रीय चित्रपट या स्पर्धेसाठी आले. महोत्सवाच्या चित्रपट परीक्षण समितीने हे १५०० हून अधिक सर्व अंतरराष्ट्रीय चित्रपट ६ महिन्यात बघून त्यातील १४ चित्रपटांची अंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागासाठी निवड केली. तसेच मराठी चित्रपट स्पर्धा विभागात आलेल्या ४० पैकी ७ चित्रपटांची निवड केली. या शिवाय सुमारे १५० देशी – विदेशी चित्रपट या महोत्सवात दाखवले जाणार आहेत.

महाराष्ट्र शासन प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपट' १० लाख रुपये, 'महाराष्ट्र शासन प्रभात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक' ५ लाख रुपये आणि 'महाराष्ट्र शासन संत तुकाराम सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट' ५ लाख रुपये अशी पारितोषिके महाराष्ट्र शासनातर्फे या महोत्सवात दिली जातात. तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळातर्फे सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, पटकथा संवादलेखक व सिनेमोटोग्राफर यांना प्रत्येकी २५ हजार रुपये अशी पारितोषिके दिली जातात. तसेच फिल्म इन्स्टिट्यूट आणि एमआयटी यांच्यातर्फेही विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात.

यंदा १३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत या महोत्सवातील चित्रपट सेनापती बापट मार्गावरील पॅव्हेलियन मॉलमधील पी.व्ही. आर आयकॉन, कॅम्प परिसरातील आयनॉक्स आणि औंध भागातील वेस्टएंड मॉलमधील सिनेपोलिस चित्रपटगृह या तीन ठिकाणी ११ स्क्रीनवर दाखवले जाणार आहेत.

पुणेकर रसिकांच्या दृष्टीने यंदाही हा महोत्सव ही मोठी पर्वणीच ठरणार आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : प्रयत्नातील सातत्य कामी येईल. दिलासादायक घटना घडतील. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृषभ** : स्वमताग्रह टाळायला हवा. महत्त्वाची कामं लांबणीवर पडतील. मानसिक अस्वास्थ राहील. ह्रह्र
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. लेखी करारात पुरेशी काळजी घ्यावी. व्यवसायात प्रगती होईल.
- **कर्क** : सरकारी कामं मनाजोगी होतील. आप्तेष्टांच्या भेटीने समाधान लाभेल. वैवाहिक सौख्य लाभेल.
- **सिंह** : नव्या विचारांना चालना मिळेल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कन्या** : रखडलेल्या योजना मार्गी लागतील. कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. विद्यार्थ्यांचा विकास होईल.
- **तूळ** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. परिश्रमाचा योग्य मोबदला मिळेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे करार विचारानं करावेत. उपजत कला–गुणांचा विकास होईल. उष्णतेचा त्रास संभवतो.
- **धनु** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. विचारांची दिशा योग्य राहील. गैरसमजाबाबत काळजी घ्या.
- **मकर** : मोठ्या खरेदीचे बेत सफल होतील. ताण–तणाव दूर झाल्याने समाधान लाभेल. चिंता नसावी.
- **कुंभ** : इतरांना विचारपूर्वक सल्ला द्या. भागीदारी व्यवसायात वाद–विवाद संभवतात. प्रकृतीची काळजी घ्या.
- **मीन** : आजचा दिवस व्यवसायवृध्दीचा राहील. आर्थिक आवक समाधानकारक राहील. प्रगती होईल.

सल्ला मोलाचा

## संकल्प लक्षात आहेत?

नवीन वर्ष सुरू होऊन जवळपास दीड महिन्याचा काळ उलटून गेला आहे. तेव्हा वर्षारंभी सोडलेले संकल्प पाळले जात आहेत की नाही, याची एकदा उजळणी करा. लक्षात ठेवा, इतरांच्या सांगण्यावरून आपण जास्त कॅलरी पोटात ढकलतो. पण कुणी तरी भरीस घालतंय म्हणून पोटावर अत्याचार करू नका. वजन कमी करायचं ठरवलं असेल तर कुणाला तरी सोबत घ्या. तुमच्याकडे स्मार्टफोनवर हेल्थ ॲप्स डाउनलोड करून आपला फिटनेस ट्रॅक करत रहा. वजन कमी करायचं म्हणून आवडते पदार्थ खाणं टाळू नका. महिन्यातून एक–दोन वेळा आवडते पदार्थ खा, प्रमाण मर्यादित ठेवा. यामुळे तुम्ही समाधानी रहाल. पेनकिलर्सवर जास्त अवलंबून राहू नका. वेदना सहन करा मात्र सतत पेनकिलर्स घेणं योग्य नाही, हे नेहमी लक्षात ठेवा. अजून बनवली नसेल तर एक आरोग्यडायरी बनवा. यात आरोग्य उद्दिष्ट्यं लिहून काढा. आरोग्यदायी जीवनशैलीकडे लक्ष द्या. झोपण्याआधी दहा मिनिटं पुस्तक वाचल्यामुळे तुम्हाला चांगली झोप लागेल. तेव्हा हे करुन बघा.

## १३ फेब्रुवारी

दिनविशेष

- २०१३ : 'सेबी'ने 'सहारा' समूहाची बँक खाती गोठवण्याचे आदेश दिले.
- २०१४ : निवडणूक आयोगाने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना चाळीस लाख रुपये खर्च करण्याची मुभा दिली.
- २०१८ : वाढत्या दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या तिन्ही दलांसाठी १५ हजार ९३५ कोटींची शस्त्रास्त्रं खरेदी करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

महत्त्वपूर्ण काही...

## नदी आहे जीवन

नद्या या देशामधील जीवनवाहिन्या असतात. नदीच्या काठाकाठाने मानवी संस्कृती विकसित झाली हे आपण जाणतो. चला तर, आज भारतातल्या मुख्य नद्यांची माहिती घेऊ या.

✻ भारतात वाहणारी सर्वात मोठी नदी म्हणजे सिंधू. कैलास पर्वतात उगम पावणारी ही नदी तब्बल ३,२०० किलोमीटर लांब आहे. ही नदी भारताप्रमाणेच पाकिस्तानातूनही वाहते आणि अरबी समुद्राला मिळते.

✻ भारतात वाहणारी दुसरी मोठी नदी म्हणजे ब्रह्मपुत्रा. ब्रह्मपुत्रेचा उगमदेखील कैलास मानसरोवरमध्ये आहे. ही नदी उत्तर पूर्व भारताची जीवनदायिनी आहे. विशेषत: आसाममध्ये प्रत्येकाला ती कुटुंबातील सदस्यांसारखी वाटते. म्हणूनच इथे ब्रह्मपुत्रेचं गुणगौरव करणारी अनेक लोकगीतं ऐकायला मिळतात. ब्रह्मपुत्रेची लांबी २,९०० किलोमीटर इतकी आहे. ती बंगालच्या खाडीला जाऊन मिळते.

✻ २,५२५ किलोमीटर लांबीची गंगा गंगोत्रीमध्ये उगम पावते आणि उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल असा प्रवास करते.

पंचांग

**गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ. १, नक्षत्र : मघा,
चंद्रराशी : सिंह, शोभन योग,
सूर्योदय : ७.१०, सूर्यास्त : १८.३६


फॉरवर्डस

**दु:ख लपवण्यासाठी बरंच काही करावं लागतं...**
मुस्कुराहट की बनावट में
छुपाए हमने गम,
दिखावट की हंसी से दुनिया
के सामने खडे हैं हम

आरोग्यमंत्र

## अवश्य करुन पाहा

नित्याच्या दिनक्रमात काही सोपे नियम पाळले तर दीर्घकाळ आरोग्य टिकण्यास मदत होते. याबाबत आणखी महत्त्वपूर्ण माहिती जाणून घेऊ या. ✻ पाणी पिताना नेहमी खाली बसूनच घोट घोट प्यावं. उभं राहून घाईघाईत पाणी पिऊ नये. ✻ जेवल्यानंतर १० ते १५ मिनीटं वज्रासनात बसावं. दुपारी जेवणानंतर वामकुक्षी (२० मिनीटे) घ्यावी. संध्याकाळी जेवण केल्यावर तीन तास झोपू नये. रात्रीच्या जेवणानंतर शतपावली करावी. ✻ कधीच ॲल्युमिनियमच्या भांड्यातील भोजन तसंच पाणी पिऊ नये. यातलं काहीही खाऊ नये. ॲल्युमिनियममधे शिजवलेले पदार्थ खाणं म्हणजे विष प्राशन करण्यासारखं आहे. ✻ जेवताना नेहमी मातीच्या भांड्यांचा वापर करावा. त्याबरोबर तांब्या, पितळाची भांडी पण चालतील. ✻ झोपताना नेहमी आकाशाकडे डोळे असावे अथवा विष्णु मुद्रेत आणि जमिनीशी जास्तीत जास्त संपर्क ठेवून झोपावं. कधीही पोटावर झोपू नये. ✻ मैदा, डालडा, वनस्पती तेल, पामतेल, बेकरीचे पदार्थ अजिबातच खावू नयेत. ✻ नेहमी लाकडी घाण्याचं तेलच वापरावं. ✻ नेहमी सेंद्रिय गुळाचा वापर करावा. (साखरेत गंधक असल्यामुळे विषसमान आहे) ✻ पचन लवकर होण्यासाठी जेवणानंतर थोडासा गुळ खावा. ✻ जेवण बनवण्यासाठी फक्त सैंधव मीठ वापरणं चांगलं. ✻ उत्तम आरोग्यासाठी कमीत कमी सहा ते सात तास झोप पुरेशी आहे. ✻ दररोज एक तास प्राणायाम, १५ मिनीटे योगासने आणि जमतील तेवढे सूर्यनमस्कार घालणं चांगलं.



वाचा तर खरं

✻ तांदळात अळ्या होऊ नये यासाठी मीठ मिसळून ठेवा.

✻ डोसा अथवा इडलीचं पीठ करताना तांदूळ दळतेवेळी मेथीदाणे टाका. यामुळे इडली–डोसा मऊ होईल.

✻ शिजवताना पालकाचा रंग हिरवागार रहावा यासाठी चिमूटभर मीठ मिसळा.

✻ कणीक मळताना पाण्याबरोबर दूध आणि सायीचा वापर केला तर पोळ्या मऊ आणि स्वादिष्ट होतील. तांदूळ शिजवताना एक चमचा तूप, मीठ आणि लिंबाचा रस मिसळावा. यामुळे भात मोकळा होतो.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

» Selected

## इंदापूर महाविद्यालयात बारावी परीक्षार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**इंदापूर :** महाराष्ट्र शासनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची इयत्ता 12वी बोर्डाची परीक्षा मंगळवार (दि ११) पासून सुरू झाली. या परीक्षार्थ्यांचे इंदापूर महाविद्यालयामध्ये उस्फुर्त स्वागत करण्यात आले. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री तसेच संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव ॲड. मनोहर चौधरी तसेच सर्व संचालक यांनी परीक्षार्थींना शुभेच्छा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे, उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे व सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले व त्यांना या परीक्षेमध्ये यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कला विभाग प्रमुख डॉ. भिमाजी भोर , विज्ञान विभाग प्रमुख डॉ.शिवाजी वीर, क्रीडा संचालक डॉ. भरत भुजबळ, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.सदाशिव उंबरदंड , प्रा.आत्माराम फलफले, डॉ.राजाराम गावडे , प्रा. श्रीनिवास शिंदे , डॉ. शितल पवार, प्राध्यापिका सुवर्णा जाधव, प्रा. श्याम सातार्ले , प्रा.रवींद्र साबळे यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक प्रा. बापू घोगरे यांनी केले, तर आभार प्राध्यापिका कल्पना भोसले यांनी मानले.


## डॉ. भरत शिंदे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान



**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बारामतीचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांना प्रदान करण्यात आला. अव्यावसायिक अभ्यासक्रम ग्रामीण विभागासाठी दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सुवर्णपदक आणि सन्मानपत्र देऊन डॉ. भरत शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थी विकास, संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासन आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या वेळी व्यासपीठावर विद्यावाचस्पती डॉ. शंकर अभ्यंकर, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. देविदास वायदंडे, डॉ. नितीन घोरपडे, डॉ. संदीप पालवे, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. संगीता जगताप तसेच उज्ज्वला भरत शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार सोहळ्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शामराव घाडगे, डॉ. लालासाहेब काशीद, डॉ. हणमंतराव पाटील, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. जयश्री बागवडे, डॉ. मनिषा खुटवड, डॉ. मंगल ससाने, डॉ. संजय खिलारे, डॉ. श्रीराम गडकर, डॉ. सुनील ओगले, डॉ. राहूल तोडमल, डॉ. कोळपकर तसेच ग्रंथपाल डॉ. अलका जगताप, विजय काकडे, राजेंद्र वळवी, तुषार जगताप, सदानंद पवार आणि अरविंद मोकाशी व शिंदे कुटुंबीय व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

## चाकणमध्ये सर्वत्र कचऱ्याचे ढीग, आरोग्य धोक्यात

**चाकण :** चाकण औद्योगिक वसाहतमधील कंपन्यांसह परिसरातील नागरिकांच्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एमआयडीसीकडे कचरा व्यवस्थापन प्रकल्प नसल्याने हा कचरा राजरोसपणे रस्त्याच्या कडेला



कचरा टाकत असल्याने रस्त्यांच्या कडेला डंपिंग एरिया होऊन औद्योगिक वसाहतीचे विद्रूपीकरण होऊन कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. चाकण औद्योगिक वसाहत महत्त्वाची औद्योगिक वसाहत मानली जाते. पाच हजारांवर छोट्या-मोठ्या कंपन्या येथे कार्यरत आहेत. सुमारे दोन लाखांवर कामगार वर्ग येथे आहे. मोठ्या प्रमाणात ऑटोमोबाइल कंपन्या आहेत. दुचाकी, चारचाकीसह इतर अवजड वाहने, अर्थमूव्हर्स मशिनरी आदी बनविल्या जातात. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना सुट्टे पार्ट व इतर साहित्य पुरवणाऱ्या अनेक छोट्या-मोठ्या कंपन्या येथे आहेत. कंपन्यांत कामगार पुरविणारे ठेकेदार व इतर साहित्य पुरवठा करणारे पुरवठादार यांची संख्या हजारोंच्या घरात आहे.मात्र कचरा प्रकल्प नसल्याने कचरा टाकायचा कोठे, हा प्रश्न कंपन्यांना भेडसावतो आहे. त्यामुळे काही ठिकाणी रस्त्यावर कचऱ्याचे ढीग दिसतात. कचरा औद्योगिक वसाहतीमधील काही कंपन्यांचा आणि व्यवसायिकांसह रहिवाशांचा आहे. एमआयडीसीमधील बहुतांश कंपन्या आणि व्यावसायिक रात्रीच्या वेळेस रस्त्याच्याकडेला कचरा टाकत आहे.यामुळे रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे मोठे ढीग साचल्याचे पहायला मिळत आहेत.या कचऱ्यात कोंबड्यांची पिसे, प्लॅस्टिकच्या पिशव्या,बाटल्या, कँटीनमधील उरलेले खाद्यपदार्थ, भाजी बाजारामधील उरलेला भाजीपाला, जुने बांधकामाचा राडारोडा, सलूनमधील केस यामुळे परिसराचे विद्रूपीकरण होत आहे.कचरा उचलला जात नसल्याने तो कुजत असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# खरेदी विक्रीची निवडणूक प्रतिष्ठेची

## विधानसभेत संघ केंद्रस्थानी, २८ तारखेपर्यंत अर्ज माघारीची मुदत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड आळंदी विधानसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अनेक राजकिय घडामोडी घडल्या. महायुतीचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांचा महविकास आघाडीचे उमेदवार बाबाजी काळे यांनी मोठया मताधिक्याने पराभव केला. आमदार बाबाजी काळे यांच्या विजयाच्या गणितात खेड तालुका खरेदी विक्री संघाची महत्त्वाची भुमिका राहिली.
या निवडणुकीत राजकिय अर्थाने खेड तालुका खरेदी विक्री संघ केंद्रस्थानी राहिला असे मानले जाते. म्हणुनच आता संघाची निवडणुक होत असताना त्यात चुरस निर्माण झाली आहे. थेट पक्षीय नसले तरी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील विरोधात आमदार बाबाजी काळे यांच्या समर्थकांमध्ये हा सामना रंगणार आहे. अनेक वर्ष बिनविरोध निवडीची परंपरा यावेळी



खंडित होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

खेड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाची पंचवार्षिक निवडणूक सुरू झाली आहे. संघाच्या संचालक मंडळातील १८ जागांसाठी निवडणूक होत आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत होती. या मुदतीत एकुण ५९ एवढे अर्ज दाखल झाले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मिलिंद राऊत यांनी दिली. त्यात अखेरच्या दिवशी म्हणजे मंगळवारी २२ अर्ज दाखल झाले आहेत.

त्यात खेड तालुक्यातील अनेक मातब्बर नेते, कार्यकर्ते यांचा समावेश आहे. दाखल अर्जाची छाननी बुधवारी (दि.१२) होणार आहे. दि. १३ ते २७ फेब्रुवारी या दरम्यान अर्ज माघारीची मुदत आहे. उमेदवारांना दि. २८ फेब्रुवारीला चिन्हवाटप होणार आहे. त्यानंतर दि. ९ मार्च रोजी सकाळी ९ ते ५ पर्यंत मतदान होणार आहे. त्याच दिवशी म्हणजे मतदानानंतर अर्ध्या तासाने मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.

खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे एकूण १५ मतदारसंघ आहेत. त्यातून १८ संचालक निवडले जाणार आहेत. निवडणुकीसाठी एकूण मतदार संख्या ४७४ आहे. तालुक्यातील १०२ विकास सोसायट्यांचे आठ मतदारसंघ असून, त्यामध्ये चाकण गट, वाफगाव , आळंदी , खेड (राजगुरुनगर) ,चास , वाडा , कडूस , महाळुंगे अशा आठ गटांचा समावेश आहे.

या प्रत्येक गटांतून एक याप्रमाणे ८ संचालक निवडून जाणार आहेत. तर व्यक्तीगट मतदारसंघातून तीन संचालक व महिला प्रतिनिधी (राखीव) या मतदारसंघातून दोन संचालक आणि अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय (ओबीसी), भटक्या विमुक्त जाती-जमाती व विशेष मागास प्रवर्ग, बिगरशेती सोसायटी प्रोसिसिंग कंझ्युमर्स संस्था या पाच मतदारसंघातून प्रत्येकी एक संचालक याप्रमाणे १८ संचालक निवडले जाणार आहेत. प्रोसेसिंग या मतदारसंघात फक्त एकच मतदार संख्या आहे आणि गेली काही वर्षे ही व्यक्ती या मतदारसंघातून संघावर कायम बिनविरोध निवडून जाते.

## देशविरोधी घोषणा देणारा अटकेत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** कान्हुर मेसाई ता. शिरूर येथील एका फर्निचरच्या दुकानात मजुरी करणाऱ्या कामगाराने पाकीस्तान झिंदाबाद घोषणा देत देशाबद्दल अवमानकारक भाषा वापरल्याबद्दल त्याचेवर गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आली असून, आरीफ सदरुलवरा सिध्दीकी असे त्याचे नाव आहे.

कान्हुर मेसाई येथील न्यू सैफ फर्निचर या फर्निचरच्या दुकानात वैभव चक्कर हा युवक त्याचे फर्निचरचे सुरु असलेले काम पाहण्यासाठी गेला असता, आरीफ सिध्दीकी याने भारताबद्दल अपशब्द वापरले, तर पाकिस्तानचे नारे त्याने दिले. वैभवने त्याला पकडत गावातील नागरिकांना याची माहिती दिली. याबाबत वैभव बाळासाहेब चक्कर (२८, रा. फलकेवाडी, कान्हुर मेसाई ता. शिरुर) यांनी याबाबत शिक्रापूर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी आरीफ सदरुलवरा सिध्दीकी (१९, सध्या रा. कान्हुर मेसाई, ता. शिरूर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्याला तातडीने अटक केली.

# श्रीनाथ म्हस्कोबांचा लग्न सोहळा उत्साहात

## फटाक्यांची आतषबाजी, लाखो भाविकांची उपस्थिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** श्री क्षेत्र वीर (ता. पुरंदर) येथे माघ पौर्णिमेच्या मुहूर्तावर फटाक्यांची आतषबाजी करत सवाई सर्जाच्या जयघोषात श्रीनाथ म्हस्कोबांचा व देवी जोगेश्वरी यांचा विवाह सोहळा शाही थाटात संपन्न झाला. यावेळी मानाच्या पालख्या व वस्त्र परिधान केलेल्या काठ्यांची पारंपरिक भेट झाली हा सोहळा पाहण्यासाठी महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून लाखो भाविक वीर येथे दाखल झाले असल्याचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र धुमाळ यांनी सांगितले.

मंगळवार (दि .११) रोजी पहाटे ५.०० व पूजा होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. नंतर ६ वा. मुख्य गाभारा दर्शनासाठी खुला करण्यात आला व सकाळी देवाला अभिषेक करण्यात आले. सकाळी १०.३० वा. देवाला दही-भाताची पूजा बांधण्यात आली. दुपारी १२ वा. धुपारती होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. दुपारी १.१५ मि. मुख्य गाभारा दर्शनासाठी खुला करण्यात आला. देवाचा लग्नसोहळानिमित्त मंदिरात फुलांची विविध प्रकारची आकर्षक



सजावट तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्यासाठी दिलीप जयसिंगराव धुमाळ (माजी विश्वस्त) व मित्र परिवार यांचेमार्फत करण्यात आले.

क्षेत्र कोडीत ची काठी-पालखी घेऊन सर्व ग्रामस्थ मंडळी सायंकाळी ७ वा. श्री क्षेत्र वीर येथे आली. यावेळी देवाची धुपारती घेऊन मुकादम-पाटील, विश्वस्थ, मानकरी, दागीनदार, सालकरी मंडळी यांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानाने भेटाभेट होऊन वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. त्यानंतर काठी-पालखी तळावर स्थानापन्न झाली. रात्रौ. ११.०० वा. समस्त राऊत मंडळीच्या वतीने देवाला पोशाख करून देव-देवतांना आव्हान करण्यात आले. श्रीनाथ म्हस्कोबा देवाच्या पालखीत उत्सवमूर्ती ठेऊन ढोल-ताश्याच्या गजरात तसेच कोडीत ची पालखी बाहेरून अंधारचिंच(बाजार तळ)येथे गेल्या.

त्यावेळी मानकं-यांना (शिंगाडे, तरडे, बुरुंगले, व्हटकर, ढवाण) फुलाच्या माळा घालण्यात आल्या. वाई व कण्हेरी पालख्यासह काठ्यांची भेटाभेट होऊन सर्व पालख्या देऊळवाड्यात आल्या. एक मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर गावचे मुकादम पाटील चंद्रकांत ज्ञानोबा धुमाळ यांच्या हस्ते विधिवत मंत्रोपचार होऊन रात्रो ३ वा. लग्नाला सुरुवात झाली. लग्न सात मंगलाष्टके होऊन लग्नसोहळा संपन्न झाला. यावेळी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती फटाक्यांची आतिषबाजी स्वप्नील हरकळ (विघ्नहर्ता डेकोरेटर्स पुणे) व प्रसाद साळुंखे यांनी केली. यावेळी पुरोहित दीपक थिटे, नंदकुमार थिटे, श्रीकांत थिटे यांनी पौराहित्य केले. सर्व काठ्या-पालख्या ग्राम प्रदक्षिणेसाठी गेल्या.

वीर गावचे मुकदम पाटील सोबत सर्व दागीनदार, सालकरी, मानकरी यांच्या उपस्थितीत मंदिरातील विधी करण्यात येत आहेत.

## पुणे-बारामती संघाची दमदार कामगिरी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** महावितरणच्या २०२४-२५ च्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेत मागील सलग दोन वर्षांच्या सर्वसाधारण विजेत्या पुणे-बारामती परिमंडल संघाने सांघिक व वैयक्तिक खेळ प्रकारात २१ सुवर्ण व ९ रौप्य पदकांची कमाई केली. मात्र यंदा थोडक्यात सर्वसाधारण विजेतेपद हुकले व या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत द्वितीय स्थान पटकावले.

बारामती येथील विद्यानगरी प्रतिष्ठानच्या क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेचा नुकताच समारोप झाला. या स्पर्धेत कोल्हापूर संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर पुणे-बारामती संघाने व्हॉलीबॉल (पुरुष), खो-खो (पुरुष), कबड्डी (महिला), बॅडमिंटन (महिला) सांघिक खेळात विजेते आणि दोन वेळा टाय झालेल्या अतितटीच्या खो-खो (महिला) मध्ये उपविजेतेपद मिळवले.

स्पर्धेतील सर्व विजेता व उपविजेत्यांना महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी संचालक सर्वश्री परेश भागवत, दत्तात्रेय पडळकर, मुख्य अभियंते सर्वश्री राजेंद्र पवार (पुणे), धर्मराज पेठकर (बारामती), दत्तात्रय बनसोडे, दिलीप दोडके, पवनकुमार कच्छोट, स्वप्नील काटकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महाव्यवस्थापक (मासं) राजेंद्र पांडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे (बारामती) व भुपेंद्र वाघमारे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

## आंबेगाव पूर्वेला गव्हाचे पीक अंतिम टप्प्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात घेतलेले गव्हाचे पिक आता अंतिम टप्प्यात आले आहे. यंदा गहू पिकाला शेवटपर्यंत स्वच्छ हवामान व मुबलक प्रमाणात पाणी मिळाल्याने यंदा उत्पादनात चांगली वाढ होणार असल्याचे गहू उत्पादक शेतकरी सांगत आहेत.

रब्बी हंगामात तालुक्याच्या पूर्व भागात पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, काठापूर, थोरांदळे आदी गावांमध्ये गव्हाचे पिक मोठ्या प्रमाणावर शेतकरी घेतात. दरवर्षी या भागातील शेतकऱ्यांना गव्हाचे विक्रमी उत्पादन देखिल मिळते. गव्हाच्या विक्रीतून शेतकऱ्यांना चांगले पैसे देखील मिळतात.

यंदा देखील गव्हाच्या पेरण्या बहुतांशी शेतकऱ्यांनी केल्या. सुरुवातीला ढगाळ हवामानाचा फटका गहू पिकाला बसला. परंतू त्यानंतर शेवटपर्यंत गहू पिकाला अनुकूल हवामानाची साथ मिळाली. पाणी देखिल शेवटपर्यंत मुबलक प्रमाणात मिळाले. आता या परिसरात गव्हाचे पिक काढणीला आले आहे. शेतकरी गहू पिकाची मळणी करण्याच्या तयारीत आहेत. या परिसरात गव्हाचे क्षेत्र अधिक असल्याने शेतकरी हॉर्वेस्टर यंत्राद्वारे गव्हाची मळणी करून घेतात. पंजाब, हरियाणा या परराज्यातून हॉर्वेस्टर यंत्रे या भागात दाखल होतात. त्यांच्याकडून शेतकरी मळणी करून घेतात. यंदा उत्पादनात वाढ होणार असल्याने गहू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## बंपर उत्पादन...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



रांजणी थोरांदळे (ता. आंबेगाव) येथे अंतिम टप्प्यात आलेले गव्हाचे पीक. (छाया : रोहीत खुडे)

## आंतरराज्य युवा आदान प्रदान उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** नेहरू युवा केंद्र पुणे, माय भारत पुणे, युवा कार्यक्रम क्रीडा मंत्रालय भारत सरकार द्वारा पुण्यामध्ये आंतर जिल्हा युवा आदान प्रदान कार्यक्रम, आंतरराज्य युवा आदान प्रदान कार्यक्रम तसेच सीमा क्षेत्र युवा आदान प्रदान कार्यक्रमांचे आयोजन २७ जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान पुणे येथील कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर पुणे येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमात संस्कृती, व्यक्तिमत्व, उद्योजकता विकास, प्रेरणादायी विचार, कौशल्य विकास, समुदाय विकास, नेतृत्व, युवकांचे कला गुण, त्यांचे ज्ञान, भाषा, संस्कृती, खानपान, इत्यादींचे आदान प्रदान करण्यात आले. तसेच पुणे शहरातील शनिवार वाडा, आगाखान पॅलेस, लाल महाल, पुण्याचे प्रसिद्ध गणपती, डेक्कन कॉलेज इतिहास संग्रहालय इत्यादींना भेटी दिली.

प्रत्येक कार्यक्रमांमध्ये १५ ते २९ वयोगटातील २७ युवक युवतींनी सहभाग घेतला. आंतरजिल्हा युवा आदान प्रदान मध्ये वर्धा जिल्हा, आंतरराज्य युवा आदान प्रदान मध्ये उत्तर प्रदेश मधील झासी, फिरोजाबाद, हमीरपुर, कुशीनगर, सीतापुर, तसेच सीमा क्षेत्र कार्यक्रमांमध्ये पंजाब, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश व बिहार राज्यांमधून प्रतिभागी सहभागी झाले होते. कार्यक्रमांमध्ये मध्ये डॉ. महानंद माने असोसिएट डीन कृषी महाविद्यालय पुणे, आशिष संजय शेटे जिल्हा युवा अधिकारी, फनिकुमार सहाय्यक क्षेत्रीय प्रचार अधिकारी केंद्रीय संचार बिरो, सुनील पोकरे माझी डायरेक्टर खादी ग्रामोद्योग मधुमक्खी पालन केंद्र पुणे, डॉक्टर अन्वर शेख प्राचार्य चॉईस कॉलेज पुणे, राजेंद्र निकरड सहाय्यक कुलसचिव कृषी महाविद्यालय पुणे, सिद्धार्थ चव्हाण कार्यक्रम पर्यवेक्षक आणि लेखा अधिकारी नेहरू युवा केंद्र पुणे, डॉक्टर निलेश जाधव रिसर्च प्रोफेसर डेक्कन कॉलेज, समीर पोलोस्ते युवा उद्योजक, आम्रपाली चव्हाण ब्रँड अँबेसिडर पुणे महानगरपालिका आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वप्निल शिंदे यांनी केले.

### दिग्गज कलाकारांची उपस्थिती, प्रतिमा फाउंडेशनचा उपक्रम

## शिक्रापुरात रंगणार शास्त्रीय संगीत व नृत्याचा पंडितोत्सव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** भारतीय शास्त्रीय संगीत व नृत्य हे कलाक्षेत्रातील परंपरा असून ती शहरी प्रेक्षकांपुरती मर्यादित राहिल्याने सदर कला ग्रामीण भागात रुजावी व नवा प्रेक्षकवर्ग निर्माण होऊन लोकांना शास्त्रीय संगीत व नृत्य समजून घेण्याची संधी मिळावी, या हेतूने प्रतिमा फाउंडेशनने पंडितोत्सव उपक्रमाची सुरुवात केली, तर या ग्रामीण शास्त्रीय कला मंचाच्या उपक्रमाला टाटा हेंड्रिकसन सस्पेन्शन लिमिटेड यांचा पाठिंबा आहे.

शिक्रापूर येथे प्रतिमा फाउंडेशनने सुरु केलेल्या




पंडितोत्सव उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, प्रसिद्ध गायक राहुल देशपांडे, पद्मश्री सुरेश तळवळकर व नृत्यांगना ऋजुता सोमण यांच्या उपस्थितीने यापूर्वी सोहळा गाजल्याने या वर्षी १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी कस्तुरी शिक्षण संस्था येथे पंडितोत्सव २०२५ तीन भागांमध्ये होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ शास्त्रीय गायक आनंद भाटे यांच्या अभिजात राग संगीतासह ठुमरी, भजन व अभंगांचा समावेश असून प्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर देखील त्यांच्या आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहे, तर दुसऱ्या विभागात कथ्थक नृत्याचे ज्येष्ठ गुरू शामा भाटे यांना जीवन गौरव पुरस्कार व संगीतकार अभिजित पोहनकर यांना कला साधना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शास्त्रीय कलेची गोडी लागावी म्हणून विद्या विकास मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, करंदी व स्वा. से. कै. शंकरराव बाजीराव डावखरे विद्यालय, पिंपळे हिवरे या शाळांतील विद्यार्थी पंडितोत्सवात सहभागी होऊन दोनशेहून अधिक विद्यार्थी कला सादर करणार आहे.
तर नागरिक व संगीत प्रेमींनी नृत्याच्या अभिजात परंपरेचा आनंद घेण्यासाठी या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिमा फाउंडेशन कडून करण्यात आले आहे.

# भक्तिमार्ग

## लडाखमधला बौद्ध धर्म...

लेह–लडाख परिसरात बौद्ध धर्माचे अनुयायी मोठ्या संख्येने आढळतात. मोन आणि दार्द हे लडाखचे मूळ निवासी मानले जातात. विविध पुराणांमध्ये याबाबतचे उल्लेख आढळतात. पहिल्या शतकाच्या आसपास लडाख कुषाण राज्याचा भाग होता. इसवीसनातल्या दुसऱ्या शतकात बौद्ध धर्म काश्मीरमधून लडाख परिसरात पसरला. या काळात पूर्व लडाख आणि पश्चिम तिबेटमध्ये पारंपरिक बोन धर्माचं पालन होत असे. बौद्ध भिख्खू हेनसांगने सातव्याा शतकात या परिसराचा उल्लेख केलाय. आजघडीला लडाख जम्मू काश्मीर राज्याचा भाग आहे. लडाखच्या उत्तरेला काराकोरम तर दक्षिणेला हिमालय पर्वत आहे. लेह परिसरातल्या लोकांचे पूर्वज तिबेटी असून लडाखी भाषा बोलतात पण पश्चिमेला



कारगिल परिसरातले लोक मुस्लीम धर्माचे अनुयायी आहेत.

बौद्धांचे सर्वाधिक मठ लेह लडाख मध्ये आहेत. त्यामुळे या भागाला मठांचं नगर असंही म्हटलं जातं. शेय, ठिकसे, हेमिस, लामायुरू, आलुची, शांती, शंकर, स्तकन, माठो हे प्रसिद्ध बौद्ध मठ या ठिकाणी आहेत. या मठांमध्ये बौद्ध संस्कृती बहरतेय. शेय गोम्पा हे लडाखमधलं महत्त्वाचं स्थान मानलं जातं. लेहपासून १२ किलोमीटर अंतरावर शेय या ठिकाणी हा मठ आहे. १६३३ मध्ये या मठाच्या बांधकामाला सुरूवात झाली. लेहच्या दक्षिण पूर्वेकडे हेमिस गोम्पा म्हणजे बौद्ध मठ आहे. हा लडाखमधला सर्वात सुंदर बौद्ध मठ आहे. बौद्ध धर्माच्या अनुयायांसोबतच इतर धर्माचे लोकही या मठांना आवर्जुन भेटी देतात.

धर्म देशोदेशीचे

## श्रीमंत योगी

**शिवाजी महाराज हे नाव उच्चारताच नतमस्तक होत नाही असा मराठी माणूस बघायला मिळणं विरळा... भूमी सुफलाम–सुफलाम आणि परचक्रापासून बंधमुक्त करण्याचं स्वप्न पाहणाऱ्या त्यांच्या तेजस्वी डोळ्यांनी जनसामान्यांमध्ये दडलेलं क्षात्रतेज जोखलं आणि हवा मिळताच ठिणगीने आगीच्या लोळाचं रूप घ्यावं तशा पद्धतीने स्वराज्याचा हा यज्ञ चेतला. शिवजयंतीच्या निमित्ताने या लोकोत्तर राजाला विनम्र अभिवादन.**




शिवाजी महाराज या युगपुरुषाची जयंती साजरी करण्यामागे केवळ उत्सवाचा आनंद लुटण हा विषय महत्त्वाचा नाही तर या विचारिक कक्षेच्या खूप पुढे जाऊन या राजाच्या, त्याच्या विचारसरणीचा, त्याच्या मोहिमांचा, धोरणीपणाचा आणि या सगळ्याच्या परिणामांचा विचार करणं गरजेचं आहे. कारण भारतभूमीत राजेरजवाडे कमी होऊन गेले अशातला भाग नाही. विलासी, जनतेला नाडणाऱ्या राजांची संख्या मोठी आहे त्याचबरोबर कल्याणकारी राजांची मांदियाळीही बरीच मोठी आहे. पण असं असताना एखादा राजा साडेतीन शतकांनंतरही जनतेच्या हृदयात सम्राट म्हणून जागा व्यापून राहतो, घराघरांमध्ये देवाच्या स्वरुपात त्याची पूजा होते तेव्हा त्याच्यातील विलक्षण गुणांचा धांडोळा घेणं गरजेचं ठरतं. शिवाजी महाराज प्रत्येक अर्थाने इतरांपेक्षा वेगळे होते. त्यांचं वेगळेपण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नसून विचारात आहे. हा राजा मळलेली वाट, अर्थव्यवस्थेची रेखीव चौकट, प्रचलिती युद्धनिती, स्त्रीयांकडे बघण्याच्या चुकीच्या धारणा यांना लंघून बाहेर पडला म्हणूनच तो लोकोत्तर ठरला. स्वराज्याचा निर्माता ठरला. त्यांनी केलेली प्रत्येक कृती एका नव्या धारणेचा, विचारांचा, बांधणीचा, पुनर्निमितीचा आरंभ ठरला. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या जयजयकार करणाऱ्या प्रत्येकाने त्यांच्या या गुणांचा अभ्यास करुन ते तत्व आचरणात आणण्याचा प्रयत्न करायला हवा.

अवघ्या १२ वर्षांचे शिवबा १६४२ मध्ये पुण्यात आले. आपल्या पित्याचं चांगलं राज्य निर्माण करण्याचं स्वप्न उरी कवटाळूनच त्यांनी आपली माता आणि पित्याच्या काही निष्ठावान कारभाऱ्यांसह पुण्यात पाऊल ठेवलं आणि हाच त्यांच्या कार्ययज्ञाचा आरंभबिंदू ठरला. पित्याने अष्टप्रधान मंडळ नेमून दिलं होतं. नीलकंठ रांजेकर, माणकोजी दहातोंडे आदींचा त्यात समावेश होता. त्यांच्या निवासाची सोय म्हणून लालमहालाची निर्मिती झाली. इथे जिजाऊने त्यांच्यावर रामाचे चारित्र्य आणि कृष्णाची रणनिती सांगून संस्कार केले. असा संघर्ष करायचा असेल तर तुलाही त्यांच्यासारखीच युद्धनिती अनुसरायला लागेल हे त्यांनी शिवरायांच्या बालमनावर बिंबवले. मावळे आणि सह्याद्री यांची साथ असल्याशिवाय तुझा संघर्ष सफल होणार नाही हेही त्यांनी निदर्शनास आणून दिलं. यातूनच शिबवांना गडकोटाच्या अभ्यासांची आणि सामान्य जनांचं सुखदु:ख जाणून घेण्याची प्रेरणा मिळाली. आदिलशाही सत्तेने शहाजीराजांच्या जहागिरीवर आक्रमण करुन ती बेचिराख केली. आधी गाढवाचा नांगर फिरवलेल्या या भूमीवर जिजाऊने बारा वर्षाच्या शिवबांच्या हस्ते सोन्याचा नांगर फिरवला आणि एका सुवर्णकाळाचा आरंभ झाला. एकाअर्थी ही भूमी शापमुक्त झाली. त्याचबरोबर शिवबाने यवनांनी उद्ध्वस्त केलेल्या कसबा गणपती मंदिराचं जीर्णोद्धार केला. अशा प्रकारे एका नव्या युगाला, आरंभाला गणेशाचे आशीर्वाद मिळाले. दुसरीकडे शिवबांनी उद्ध्वस्त जहागिरीची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. त्यांनी देशमुख–देशपांडे या वतनदारांच्या माध्यमातून रयतेशी संपर्क साधला आणि पुनर्वसाहतीसाठी नागरिकांचं सहकार्य मागितलं. पण जनता अस्मानी आणि सुलतानी संकटाने ग्रासलेली होती. त्यांच्याकडे घालायला कपडा, पोटाला घास, दावणीला बैल आणि राहण्यासाठी निवारा नव्हता. जमीन पडीक पडली होती. ही विदारक अवस्था जाणल्यानंतर शिवबाने प्रत्येकाला गरज असेल ती मदत करण्याचं जाहीर केलं. अवजारं नसतील त्यांना अवजारं दिली, अन्नाचा घास नसणाऱ्यांना खंडी दोन खंडी धान्य दिलं, शेतीच्या कामासाठी बैल नसणाऱ्यांनी ती मदत देऊ केली. अशा प्रकारे त्यांनी रयतेची मूलभूत प्रश्नांपासून सुटका केली. एवढंच करुन ते थांबले नाहीत तर जो शेतकरी पडीक जमीन लागवडीखाली आणेल त्याला पाच वर्षे सारा माफ केला. सतराव्या शतकात अशा प्रकारे करमुक्त व्यवस्था निर्माण करुन शिवबाने पडीक पडलेली जमीन लागवडीखाली आणून कृषीप्रधान देश बनवण्याचा एक आरंभ केला. म्हणजेच त्याच्या प्रयत्नाने एके काळचा सुवर्णभारत नव्याने उदयाला येण्याची आशा निर्माण झाली. इथे त्यांची आपल्या भूमीला सुजलाम् सुफलाम् करण्याची दूरदृष्टी दिसून येते. अशा प्रकारचा भारतातील हा पहिलाच प्रयत्न म्हणता येईल. म्हणूनच महाराज स्वराज्याबरोबरच सुराज्याचे पुरस्कर्ते ठरतात.

अशा प्रकारे आवाहन केल्यावर लोकांचा पोटाचा, अवजाराचा, बी–बियाणांचा, निवाऱ्याचा प्रश्न मिटला. त्यामुळे सगळे राजांच्या मागे एकजुटीने उभे राहिले. पण हे करताना महसूल वाढवण्यासाठी राजांनी आणखी एक परिणामकारक उपाय योजला. त्यांनी आदिलशाही सत्ता, निजामशाही आणि मुघल यांची सत्ता आकारात असणारा साठ टक्के कर ३३ टक्क्यावर आणला. अर्थातच हा सारा सुपीक जमिनीसाठी होता. म्हणजेच आजच्या भाषेत बोलायचं तर कराचं प्रमाण निम्म्यावर आलं. साहजिकच या निर्णयामुळे शहाजी राजांच्या जहागिरीतला शेतकरी कामाला जुंपला. पहिल्यावर्षी दहा टक्के, दुसऱ्या वर्षी दहा टक्के असं करत करत पाचव्या वर्षांपर्यंत शहाजीराजांच्या जहागिरीतली शंभर टक्के भूमी लागवडीखाली आली. शिवाजी महाराज पुणे प्रांतात येण्याआधी या जहागिरीतील केवळ चाळीस टक्के भूमी लागवडीखाली होती ती अवघ्या पाच वर्षात शंभर टक्क्यांपर्यंत पोहचली. अर्थातच या सगळ्या निर्णयामागे शिवाजी महाराजांना मातेबरोबरच दादोजी कोंडदेव, बाजी पासलकर, कान्होजी जेधे या जाणकारांचं मार्गदर्शन होतं. या मार्गदर्शनाच्या बळावरच शिवाजी नावाच्या प्रभूरामचंद्राने निर्माण केलेलं हे स्वराज्य, त्यातील सुख पाहून जनतेच्या मनात साहजिकच उन्नत विचार उत्पन्न झाले. शिवाजी राजाने आपला विचार करुन निर्माण केलेलं हे साम्राज्य शाश्वत टिकवायचं हा विचार प्रत्येकाच्या मनात बळावला आणि हे सुराज्य टिकवायचं तर शिवाजी टिकला पाहिजे, शिवाजीचं रक्षण झालं पाहिजे हा विचार सामान्यातली सामान्य मनापर्यंत पोहचला. ही भूमिका दुसरी कुठली नसून राष्ट्रवादाची आहे. हे राष्ट्र माझं आणि मी या राष्ट्राचा या विचाराची पायाभरणी कदाचित याच आरंभपर्वाचा अंश असेल.

भक्ती लेख

एकदा ही राष्ट्रवादाची भूमिका उत्पन्न झाली की सुराज्याचं रक्षण ही बाब अवघड रहात नाही. हेच शिवरायांच्या स्वराज्याबद्दल घडलं. हे स्वराज्य टिकवण्यासाठी केवळ सैनिकच नव्हे तर कष्टकरी, कारागीर, बारा बलुतेदार सगळेच कामाला लागले आणि राज्याच्या रक्षणाला सिद्ध झाले. मग शिवाजी महाराजांनी गवंड्यांना सांगितलं 'आपल्याला गडकोट उभे करायचे आहेत.' त्यानुसार गवंडी कामाला लागले. सुतारांना त्यांच्या योग्यतेचं काम मिळालं. अशा प्रकारे प्रत्येकाच्या हाताला काही ना काही काम मिळालं. मुख्य म्हणजे प्रत्येक जण सुराज्याशी जोडला गेला. या अद्वैतामुळेच सामान्य शेतकऱ्याच्या जन्मलेला तानाजी मालुसरेसारखा माणुस आपल्या पोटच्या मुलाचं लग्न बाजूला ठेवून सुराज्याच्या कामासाठी पुढे सरसावला. बाजीप्रभू देशपांडे यांचे उदाहरण यापेक्षा वेगळं नाही. सुराज्य राखण्याच्या कामी आलेले हे हिरे शिवरायांच्या मुशीत घडले होते. ते सगळेजण राष्ट्रीयत्वाच्या भावनेने प्रेरित झालेले होते. माणसं जन्माला घालणं आणि घडवणं या दोन पूर्णत: भिन्न बाबी आहेत. शिवरायांनी माणसं घडवण्याचं काम केलं. त्यांचं हेच कसब सामान्यातल्या असामान्यांना जन्म देऊन गेलं. शिवरायांनी अतिशय माफक क्षमतेनिशी बलाढ्य शत्रूशी दोन हात करण्याची नवी युद्धनिती आखली. आज हाच गनिमी कावा रणनितीतील एक महत्त्वाचा भाग म्हणून अभ्यासला जातो. तो काळ शत्रू पक्षातील स्त्रियांकडे उपभोग्यवस्तू म्हणून बघण्याचा होता. विजय मिळवल्यावर शत्रुच्या गोटातील मुली आणि महिलांना वाटून घेण्याचा तेव्हा शिरस्ता होता. आपल्या राज्यातील महिला, मुलींकडे बघण्याचीदेखील रासवट आणि रानटी भूमिका होती. मात्र शिवरायांनी कायमच स्त्रियांचा सन्मान केला. परस्त्रीला मातेचा दर्जा देणारा हा राजेश्वर होता. महिलांवर अत्याचाराच्या हेतूने उठणारे हात कलम करण्याचं धारिष्ट्य त्यांच्यात होतं. किल्लेदार फितूर होणार नाही याची दक्षता घेतली गेलीच, मात्र एखादा किल्लेदार फितूर असल्याची शंका आल्यास आणि खात्री पटल्यास त्याचा शिरच्छेद करुन, प्रत्येक गडावर त्याचं शिर मिरवून भीती निर्माण करण्याचा उपायही त्यांनी योजला. पण त्याचवेळी गावकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही स्पर्श न करण्याची ताकीद देणारा हा राजा होता. म्हणजेच शिवरायांनी एका वेळी अनेक व्यवधाने पाळली. आरमार उभारणी, शत्रुचा बंदोबस्त, शत्रुच्या युद्धनितीची नेमका अभ्यास, शत्रू गाफील असल्याचं पाहून नेमकी वेळ साधणं, अतिशय शांत डोक्याने शत्रुला पराजित करण्याची रणनिती आखणं आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जगभर रुढ असणाऱ्या सरंजामशाही पद्धतीला बाद करणं या सर्वाचा आरंभ शिवाजी महाराजांपासूनच होतो. म्हणूनच काही जण शिवरायांमध्ये शिवाचा अंश शोधतात तर काहीजण त्यांना विष्णूरुप मानतात. या लोकोत्तर राजामध्ये या दोन्ही देवतांची तत्त्वं समरस झाली आहेत. म्हणूनच त्यांना देवत्त्व मिळालं आहे.



## महत्त्व चारधाम यात्रेचं...

हिंदू धर्मात विविध यात्रांना खूप महत्त्व आहे. अमरनाथ यात्रा, नर्मदा परिक्रमा, कैलास मानसरोवर अशा यात्रा केल्या जातात. चार धामांच्या यात्रेलाही खूप महत्त्व आहे. उत्तराखंड राज्यातल्या गंगोत्री, यमुनोत्री, बद्रीनाथ आणि केदारनाथ या स्थानांच्या यात्रेला चार धाम यात्रा असं म्हटलं जातं. चार धाम यात्रेमुळे पापांपासून मुक्ती मिळतेच शिवाय जन्म आणि मृत्यूच्या चक्रातूनही जीवाची सुटका होते, असं म्हटलं जातं. या चारही धामांना पवित्र मानलं गेलंय. हिंदू धर्मग्रंथांमध्येही या स्थानांचा उल्लेख आढळतो.

या स्थानी आलेली प्रत्येक व्यक्ती पुण्यवान असते, अशा लोकांची या जन्मातली पापं धुतली जातात. तसंच हे जीव जन्म–मृत्यूच्या बंधनातूनही कायमचे मुक्त होतात, असा उल्लेख धर्मग्रंथांमध्ये आढळतो. या स्थानी पृथ्वी आणि स्वर्ग एकाच ठिकाणी येतात, असं मानलं जातं. या स्थानी आल्यानंतर यमुनोत्री आणि गंगोत्री या स्थानांचं सर्वात आधी दर्शन घेतलं जातं. इथल्या पवित्र जलाने केदारनाथाचा अभिषेक केला जातो. या यात्रेत सर्वप्रथम हरिद्वार मग ऋषीकेश, देव प्रयाग, टिहरी, धरासु, यमुनोत्री, उत्तरकाशी, गंगोत्री, त्रियुगनारायण, गौरीकुंड आणि अखेरीस केदारनाथाचं दर्शन केलं जातं.

तीर्थक्षेत्र

यात्रेचा हा मार्ग अत्यंत पवित्र मानला जातो. केदारनाथला जाण्यासाठी वेगळा मार्ग घ्यावा लागतो. ऋषीकेशहून देवप्रयाग, श्रीनगर, रूद्रप्रयाग, अगस्तमुनी, गुप्तकाशी आणि गौरीकुंड यांचं दर्शन केल्यानंतर केदारनाथला पोहोचता येतं. केदारनाथजवळच मंदाकिनी नदीचं उगम स्थान आहे. ही नदी रूद्रप्रयाग येथे अलकनंदा नदीत जाऊन मिळते.

## फेंगशुई शास्त्रातून...

**भारतीय वास्तूशास्त्रासोबतच फेंगशुई शास्त्राचा वापरही वाढतच चाललाय. फेंग म्हणजे वायू आणि शुई म्हणजे जल. याचाच अर्थ फेंगशुई शास्त्र वायू आणि जल या तत्त्वांवर आधारलंय. फेंगशुई शास्त्राचा वापर अत्यंत सोपा आहे. त्यामुळे त्याचा अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जातोय. घरात सुख, शांती आणि समृद्धी आणण्यासाठी तुम्हाला या टिप्सची मदत घेता येईल.**

घराच्या पूर्वोत्तर दिशेला कारंजं किंवा तलाव असणं शुभ मानलं जातं पण यातल्या पाण्याचा प्रवाह घराच्या दिशेने असणं गरजेचं आहे.

* फेंगशुई शास्त्रात ड्रॅगनला खूप महत्त्व आहे. ड्रॅगन हा घराचा रक्षक असतो. त्यामुळे घरात ड्रॅगनची मूर्ती ठेवण्याविषयी सांगण्यात आलंय.
* फेंगशुई शास्त्रात कॉस्मिक ब्रेथ किंवा लाईफ फोर्स ऊर्जा असते. ही ऊर्जा घराच्या प्रवेशद्वारातून आत येते. म्हणूनच घराच्या प्रवेशद्वारालगत किंवा आसपास कोणतंही सामान असू नये.
* घराला नकारात्मक ऊर्जेपासून मुक्त ठेवण्यासाठी मातीच्या भांड्यात मीठ घालून हे भांडं पूर्व दिशेला ठेवा. दर चोवीस तासानंतर भांड्यातलं मीठ बदलत रहा.
* ऑफिसमधल्या कॉन्फरन्स हॉलमध्ये धातूची सुंदर मूर्ती ठेवायला हवी. यामुळे अनेक लाभ होतात.
* घरात झरा, नदी यांची चित्रं उत्तर दिशेला लावावी. घरात हिंसक चित्रं लाऊ नयेत. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करते.
* लव्ह बर्ड, मेंडरिन डकसारख्या पक्ष्यांच्या मूर्ती ठेवल्याने पती–पत्नींच्या आयुष्यात आनंद बहरतो.



* विंड चाईममुळे घरात सकारात्मक ऊर्जेचा वावर राहतो.
* घराबाहेर काळं कासव, लाल पक्षी, पांढरा वाघ, हिरवा ड्रॅगन असेल तर नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करू शकत नाही.
* फेंगशुई शास्त्रात बोन्साय तसंच कॅक्टसला अशुभ माानण्यात आलंय. त्यामुळे ही झाडं घरात ठेऊ नयेत.

वास्तू भक्ती

## सकारात्मक आयुष्याच्या दिशेने...

नवं वर्ष सुरू झालंय. नव्या वर्षात आपण अनेक संकल्प केले असतील. आयुरारोग्य उत्तम रहावं यासाठी झटायचं ठरवलं असेल. शारीरिक आरोग्यासाठी झटताना आपण मानसिक आरोग्याचाही विचार करायला हवा. प्रतिकूल परिस्थितीतही सकारात्मकतेला विसरून चालण्यासारखं नाही. सकारात्मक वृत्ती असेल तर आपण प्रत्येक संकटाला, समस्येला दूर सारू शकतो. संकटं प्रत्येकावर येत असतात. आपलं आयुष्य कधीही सरळ साधं नसतं. त्यात अनंत चढ–उतार असतात. पण विपरित परिस्थितीत डगमगणारा मनुष्य आयुष्यात सुखी होऊ शकत नाही. मानवी जीवनात मानसिकतेचं स्थान उच्च आहे. आपल्या मानसिकतेवर सर्व काही अवलंबून असतं. आपल्या आयुष्यात येणारी दु:खं, यश, अपयश, सुख हे सगळं मानसिकतेवर अवलंबून असतं. आपल्या मनात नकारात्मकता असेल तर चांगल्या गोष्टी कधीही घडू शकत नाहीत पण सकारात्मक विचारसरणीने आपण बरंच काही बदलू शकतो.




आपल्या मनात सगळं काही सामावून घेण्याची शक्ती असते. मन सर्वात शक्तीशाली मानलं जातं. मानसिकतेच्या जोरावर आपण मृत्यूलाही परतवून लाऊ शकतो. म्हणूनच मनाची शक्ती प्रचंड महत्त्वाची मानली जाते. आपल्या मानसिकतेत रोगनिवारणाची ताकदही आहे. आपलं मन कायम उदास असेल तर आयुष्यात सकारात्मकतेचा प्रवेश होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीची मानसिकता वेगळी असते. म्हणूनच प्रत्येकाचं नशीबही वेगळं असतं. आपण आपल्या भविष्याप्रती आशादायी असलं पाहिजे. सकारात्मक विचार केला तर आयुष्यात सकारात्मक घडेल हे कायम लक्षात ठेवा. आपल्या कामाचा आनंद घ्या. कामाप्रती निष्ठावान रहा. भविष्यात आपलं चांगलं होईल, हा विचार करत रहा. नशीब घडवणारे आपणच असतो. ही बाब कायम लक्षात ठेवा, असं स्वामी विवेकानंद यांनी सांगितलंय. कोणत्याही कामात आपण रस घेतला नाही तर फळ मिळणार नाही. आयुष्यात अपयशच येणार. त्यामुळे सकारात्मक मनोवृत्ती ठेवा आणि पुढे जा. नव्या वर्षात प्रत्येकाने हा संकल्प करायला

भक्ती आणि बोध

## खुणा आध्यात्मिक जागृतीच्या...

आपल्या प्रत्येकात एक शक्ती दडली आहे. प्रत्येकाने आध्यात्मिकदृष्ट्या जागृत होणं खूप गरजेचं आहे. आध्यात्मिक जागृतीच्या काही खुणा आहेत. या खुणा दिसत असतील तर आपली वाटचाल आध्यात्मिक जागृतीच्या दिशेने होतेय हे नक्की! या खुणांविषयी...



* आध्यात्मिक जागृती झाल्यानंतर आपल्या शरीरातले विविध अवयव दुखू लागतात. मान, खांदे आणि पाठीच्या वेदना वाढतात. तुमच्या डीएनएमध्ये बदल घडत असल्याने या वेदना जाणवू लागतात.
* कोणत्याही कारणाशिवाय आतून दु:खी असल्यासारखं वाटत राहतं. आपण आपला भूतकाळ बाहेर टाकत असल्याने दु:खाची भावना निर्माण होते.
* कोणत्याही कारणाशिवाय रडणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची, जागृतीची खूण आहे. अश्रूंच्या रूपात आपली दु:खं वाहून जातात. ही खूण आरोग्यदायी आणि सकारात्मक मानली जाते. यामुळे शरीरातली नकारात्मक ऊर्जा दूर सारली जाते.
* नोकरी किंवा व्यवसायात अचानक झालेला बदल ही सुद्धा आध्यात्मिक जागृतीची खूण मानली जाते. तुमच्यात बदल झाला की आसपासची परिस्थितीही बदलते.
* कौटुंबिक नात्यांमधून आलेली विरक्ती ही अध्यात्मिक उन्नतीची खूण आहे. आधीच्या जन्मातील कर्मांमुळे तुम्हाला एक कुटुंब मिळतं. या कर्माच्या चक्रातून मुक्ती मिळाली की नात्यांचे बंध सुटू लागतात. कुटुंब आणि मित्रांपासून तुम्ही दूर जाऊ लागता.
* झोपेचं चक्र बिघडणं ही आणखी एक खूण मानली जाऊ शकते. रात्री २ ते ४ या वेळेत तुम्ही उठता. तुमच्या मनात अनेक गोष्टी सुरू असतात.
* युद्ध, मारामारीची स्वप्नं, कुणी तरी पाठलाग करतंय असं स्वप्न पडणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची लक्षणं आहेत.
* पावलं जमिनीवर ठेवता येत नाहीत किंवा आपण दोन जगांच्या मधून चालतोय अशी भावना निर्माण होणं ही सुद्धा आध्यात्मिक उन्नतीची खूण असू शकते.
* तुम्ही स्वत:शी बोलू लागता, संवाद साधता. स्वत:शी संवाद साधण्याचं प्रमाण वाढणं हे सुद्धा आध्यात्मिक जागृतीचं लक्षण आहे.
* आसपास माणसं असतानाही एकटेपणा जाणवणं हे लक्षण आध्यात्मिक उन्नतीकडे अंगुलीनिर्देश करतं.
* सगळ्या इच्छा मरणं, काहीही करावंसं न वाटणं तुम्हाला आध्यात्मिक उन्नतीकडे घेऊन जाऊ शकतं.
* तुम्हाला घरी परतण्याची ओढ लागते. पृथ्वीवरचा आपला वास संपवून खऱ्या घराची म्हणजे स्वर्गाची ओढ लागू लागते.


अध्यात्म

## वेगवेगळ्या भाषांमधील रामायण

रामायण म्हटलं की आपल्याला वाल्मिकी रामायण आठवतं. यासोबतच रामचरितमानसही आपल्याला माहित आहे. वाल्मिकी रामायण हे हिंदू धर्मातलं खूप मोठं महाकाव्य आहे. या रामायणात २४ हजार श्लोक आहेत. रामायण त्रेतायुगात घडलं असं मानलं जातं. तुलसीदासानेही रामचरितमानस हा ग्रंथ लिहिला. वाल्मिकी रामायणाप्रमाणे रामचरितमानसातही रामाचे गोडवे गाण्यात आले आहेत. यात रामाचं आयुष्य वर्णन करण्यात आलंय पण या दोन रामायणांव्यतिरिक्त इतरही रामायणं आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या...

* राम अस्तित्त्वात असताना वाल्मिकी रामायण लिहिण्यात आलंय. त्यामुळे रामाविषयीचा हा सर्वात प्रामाणिक ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात रामाविषयी सर्व काही आढळतं.
* तुलसीदासांनी रामचरितमानस लिहिलं. हा ग्रंथ अवधी भाषेत असून त्याचा अनुवाद विविध भाषांमध्ये झाला आहे.
* यासोबतच तमिळमध्ये कम्बन रामायण, आसाममध्ये आसामी रामायण, ओरिसामध्ये विलंका रामायण, कन्नड भाषेत पंप रामायण, काश्मीरमध्ये काश्मीरी रामायण, बंगालमध्ये रामायण पांचाली आणि मराठीत भावार्थ रामायण लोकप्रिय आहे.
* भारतासह विविध देशांमध्येही रामायणं आहेत. मलेशियातलं हिकायत सेरीराम, थायलंडमधलं रामकियेन, नेपााळमधलं भानुभक्तकृत रामायण प्रसिद्ध आहे.
* जगभरात रामायणाशी संबंधित ग्रंथांची संख्या ३०० हून जास्त आहे. अद्भूत रामायण, अध्यात्म रामायण आणि आनंद रामायण महत्त्वाची मानली जातात. उक्त रामायणात रामकथेशी संबंधित नव्या गोष्टी कळतात.
* नेपाळ, लाओस, कंबोडिया, मलेशिया, इंडोनेशिया,

जाणून घ्या



बांगलादेश, भूतान, श्रीलंका, बाली, सुमात्रा, जावा, थायलंडसारख्या ठिकाणी आजही रामाचं ग्रंथरूपात अस्तित्त्व आहे. चीनमध्येही रामायण आहे. चीनी रामायणाला अनामकं जातकम आणि दशरथ कथानम असं म्हटलं जातं. चीनमधल्या रामायणातल्या पात्रांची नावं वेगळी आणि घटनाही वेगळ्या आहेत पण भारतीय संस्कृतीतल्या रामाशी याचं साधर्म्य आहे.

* मंगोलियामध्येही रामाचं महत्त्व आहे. इथल्या लामांच्या स्थानी वानरपुजेशी संबंधित पुस्तकं आाणि मूर्त्या सापडल्या आहेत.
* तिबेटमध्ये रामकथेला किंरस पुस पा असं म्हटलं जातं. इथल्या लोकांना वाल्मिकी रामायणाविषयी माहिती आहे.

## At a Glance

### इंद्राणी मुखर्जींची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** माजी मीडिया एक्झिक्युटिव्ह इंद्राणी मुखर्जी यांची परदेशात जाण्याची परवानगी मागण्याची याचिका बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. स्वत: ची मुलगी शीना बोरा हिच्या हत्या प्रकरणात मुखर्जी प्रमुख आरोपी आहे. या प्रकरणातील खटला जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला दिले.
मुंबई उच्च न्यायालयाने इंद्राणी मुखर्जी यांना परदेशात जाण्याची परवानगी नाकारली होती.

### प्रणव मुखर्जी यांचे चिरंजीव काँग्रेसमध्ये

**कोलकाता :** माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे चिरंजीव अभिजित मुखर्जी यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये चार वर्षांच्या कार्यकाळानंतर बुधवारी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आणि पश्चिम बंगालचे प्रभारी गुलाम अहमद मीर यांच्या उपस्थितीत पक्षाच्या राज्य मुख्यालयात माजी खासदार ांना काँग्रेसचे सदस्यत्व देण्यात आले.

### भीषण अपघातात दाम्पत्याचा मृत्यू

**जयपूर :** राजस्थानमधील श्रीमाधोपूर भागात टोलनाक्याजवळ कार दुभाजकावर आदळून झालेल्या अपघातात एका दाम्पत्याचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. अजित सिंग (३५) आणि त्यांची पत्नी सीमा (३३) अशी मृतांची नावे आहेत.

# मोदी-ट्रम्प बैठकीकडे जगाचे लक्ष

## पंतप्रधान वॉशिंग्टनमध्ये दाखल, होणार थेट प्रक्षेपण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची १३ फेब्रुवारी ला वॉशिंग्टनमध्ये भेट होणार आहे. या बैठकीकडे जगाचे लक्ष लागले आहे, कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दुसऱ्या टर्मचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी ही पहिलीच द्विपक्षीय बैठक असेल. 12 फेब्रुवारीला संध्याकाळी पंतप्रधान मोदी वॉशिंग्टनमध्ये दाखल होणार आहेत. त्यानंतर 13 फेब्रुवारीला व्हाईट हाऊसमध्ये त्यांची राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत महत्त्वाची बैठक होणार आहे. मात्र, ही बैठक नेमकी कधी होणार याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

या ऐतिहासिक बैठकीचे थेट प्रक्षेपण पंतप्रधान मोदी आणि भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केले जाईल. याशिवाय अनेक आघाडीच्या वृत्तवाहिन्याही या बैठकीचे विस्तृत कव्हरेज करणार आहेत. त्याचबरोबर व्हाईट हाऊसच्या अधिकृत पोर्टलवरही त्याचे प्रसारण होण्याची शक्यता आहे.



### भारताकडून यादी सादर?

● पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर जाण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांची ही पहिलीच भेट असेल. दरम्यान, भारत अमेरिकेला एक यादी सादर करू शकतो, ज्यात धोकादायक गुन्हेगारांची नावे आहेत, अशी बातमी आहे. हे गुन्हेगार अमेरिकेत लपून बसल्याचे बोलले जात आहे. ही यादी केव्हा सादर केली जाणार आणि त्यात कोणत्या गुन्हेगारांची नावे आहेत, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गँगस्टर गोल्डी बरार आणि अनमोल बिश्नोई यांच्या नावांचा समावेश असू शकतो. अनमोल हा तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ आहे. भारतातील अनेक सुरक्षा यंत्रणांनी ही यादी तयार केली आहे. गृह मंत्रालयातील सूत्रांच्या हवाल्याने या वृत्तात म्हटले आहे की, केंद्रीय यंत्रणांकडे परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांची यादी आधीच आहे. त्याचबरोबर गेल्या आठवड्यात अशी यादी तयार करण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले आहे, ज्यात अमेरिकेत लपलेल्या गुन्हेगारांची नावे समाविष्ट केली जाणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणातही अनमोलचे नाव समोर आले होते. तर पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला याचा संबंध गोल्डी ब्रारसोबत या खून प्रकरणात जोडला गेला होता. गोल्डी हा लॉरेन्स टोळीचा महत्त्वाचा सदस्य मानला जातो.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून २० जानेवारी रोजी शपथ घेतली. यानंतर पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्यात २७ जानेवारी रोजी पहिली चर्चा झाली, ज्यात दोन्ही नेत्यांनी परस्पर विश्वास आणि सामरिक भागीदारी मजबूत करण्यावर भर दिला. व्यापार, ऊर्जा आणि संरक्षण सहकार्य या प्रमुख मुद्द्यांवर या चर्चेत चर्चा झाली.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, भारत आणि अमेरिका या दौऱ्याचा कार्यक्रम लवकरात लवकर निश्चित करण्याचे काम करत आहेत. उभय देशांमधील व्यापक जागतिक सामरिक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१७ मध्ये अमेरिकेचा दौरा केला होता, तर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प फेब्रुवारी २०२० मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. नुकतेच दोन्ही नेत्यांमध्ये दोनवेळा फोनवर चर्चा झाली.

# संजय राऊत यांना संस्कृती समजलीच नाही

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा टोला



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून भारतीय जनता पार्टीने सदस्य अभियान नोंदणी सुरू केली होती, याला जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. राज्यात भाजपाने सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात केलीय. १ कोटी नवीन सदस्य नोंदणी भाजपने केलीय. ४२ हजार शहरी भागात नोंदणी झालेय, तर ५५ हजार ग्रामीण भागात नोंदणी झालीय, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलीय. बुधवारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, यावेळी त्यांनी शरद पवारांच्या हस्ते एकनाथ शिंदेंना जो पुरस्कार देण्यात आलाय, यावर खासदार संजय राऊतांनी जी टीका केली होती, त्याचाही त्यांनी खरपूस समाचार घेतलाय.

राजकारण

शरद पवारांनी एकनाथ शिंदेंना पुरस्कार देणे म्हणजे महाराष्ट्राचे शत्रू अमित शाहांचा गौरव करण्यासारखा आहे, असं संजय राऊत म्हणाले होते. यावर बोलताना बावनकुळे म्हणाले की, संजय राऊत यांना महाराष्ट्राची संस्कृती समजली नाही. शरद पवार साहेबांनी एकनाथ शिंदेंचा सत्कार करणे किंवा त्यांच्या हस्ते पुरस्कारे देणे... एखाद्या पुरस्कारासाठी शिंदेंची निवड करणे ही या महाराष्ट्राची संस्कृती आहे. यापूर्वी मला वाटलं होतं की, शरद पवार हे संजय राऊत यांना सल्ला देत होते, असा आमचा समज होता. पण आता संजय राऊत हे शरद पवारांना सल्ला द्यायला लागले आहेत का? महाराष्ट्राची संस्कार आणि संस्कृती जपण्याचं काम शरद पवारांनी केलंय. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्यापेक्षा एकनाथ शिंदेंनी चांगले काम केले हे शरद पवारांनी मान्य केलंय, म्हणून पवारांच्या हस्ते शिंदेंना पुरस्कार देण्यात आलाय. शिंदेंनी १८-१८ तास काम केलंय. पण उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना केवळ दोनवेळा मंत्रालयात आले. राज्याची वाट लावण्याचं काम ठाकरेंनी केलं. तर शिंदेंनी राज्याला पुढे नेण्याचे काम केलं. यातून उद्धव ठाकरे यांनी शिकले पाहिजे, असा टोला चंद्रशेखर बावनकुळेंनी उद्धव ठाकरेंना लगावला.

# रेवडी वाटपावर सर्वोच्च न्यायालय नाराज

**नवी दिल्ली :** लोकांना धान्य आणि पैसे मोफत मिळत राहिले तर त्यांना काम करण्याची इच्छाच राहणार नाही. त्यांना मोफत रेशन मिळत आहे आणि कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत. हे सांगणे दुःखद आहे; पण आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का ? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत. अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का ?, अशा शब्दांमध्ये सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या मोफत योजनांवर बुधवारी (दि. १२) सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले.

खंडपीठाने स्पष्ट केले की, "अशा मोफत योजनांमुळे लोक काम करण्याचे सोडून देतात. त्यामुळे लोक परावलंबी होत आहेत. न्यायमूर्ती गवई यांनी म्हणाले की, "हे सांगताना



खूप दुखः होते की आपल्याला बेघर लोकांना मुख्य प्रवाहात सामिल करता येऊ शकत नाही का? ते देशाच्या विकासात योगदान देऊ शकणार नाहीत का? अशा मोफत योजना राबवून आम्ही एक परावलंबी वर्ग तयार करत आहोत का?, असा सवाल करत सरकारच्या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास टाळाटाळ करताहेत.

# आचार्य सत्येंद्र दास यांचे निधन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अयोध्या :** श्रीराम जन्मभूमी मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास यांचे ८५ व्या वर्षी ब्रेन हॅमरेजमुळे निधन झाले. आचार्य सत्येंद्र दास यांना ब्रेन हॅमरेज ३ फेब्रुवारी रोजी झाले. तब्येत बिघडल्याचे लक्षात येताच त्यांना लखनऊच्या संजय गांधी पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स (एसजीपीजीआयएमएस) या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना त्यांनी बुधवार १२ फेब्रुवारी रोजी अखेरचा श्वास घेतला. आचार्य सत्येंद्र दास यांचे अंत्यसंस्कार अयोध्येत केले जातील. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी एक्स पोस्ट करुन शोक व्यक्त केला आहे.

### कोण आहेत आचार्य सत्येंद्र दास ?

● आचार्य सत्येंद्र दास ३३ वर्षांपासून राम मंदिराच्या सेवेत होते. ते दररोज प्रभूरामाच्या मूर्तीची पूजा करत होते. तत्कालीन खासदार विनय कटियार, विश्व हिंदू परिषदेचे तत्कालीन प्रमुख अशोक सिंघल या दोघांनी पाठिंबा दिला आणि १ मार्च १९९२ रोजी सत्येंद्र दास यांची राम मंदिरात मुख्य पुजारी म्हणून नियुक्ती झाली होती. सत्येंद्र दास यांनी १९७५ मध्ये संस्कृत विद्यालयातून आचार्य ही पदवी घेतली होती. ते काही काळ एका महाविद्यालयात संस्कृत व्याकरणाचे सहायक अध्यापक (सहायक शिक्षक) होते.

आचार्य सत्येंद्र दास यांच्यावर एसजीपीजीआयएमएसमध्ये न्यूरॉलॉजी विभागातील (वॉर्ड) हाय डिपेंडन्सी युनिट अर्थात एचडीयूमध्ये उपचार सुरू होते. त्यांच्या निधनाची माहिती प्रदीप दास यांनी दिली. प्रदीप दास हे आचार्य सत्येंद्र दास यांचे शिष्य आहेत. प्रदीप दास यांनी दिलेल्या माहितीनुसार, आचार्य सत्येंद्र दास यांनी बुधवार १२



फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता अखेरचा श्वास घेतला. सत्येंद्र दास यांच्या पार्थिवावर गुरुवार १३ फेब्रुवारी २०२५ रोजी अयोध्येत शरयू नदीकिनारी अंत्यसंस्कार केले जातील. काही दिवसांपूर्वी एसजीपीजीआयएमएस रुग्णालयाने काढलेल्या एका मेडिकल बुलेटिनमध्ये आचार्य सत्येंद्र दास यांना रक्तदाब आणि मधुमेहाचा त्रास आहे असल्याचाही उल्लेख होता.

### सुनीता विल्यम्स पृथ्वीवर परतणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स गेल्या वर्षी ५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेल्या होत्या. तेव्हापासून त्या तिथेच अडकल्या आहेत; पण आता 'नासा'ने सुनीता विल्यम्सच्या पृथ्वीवर परतण्याबाबत एक गूड न्यूज दिली आहे. नासाने म्हटले आहे की, "अंतराळवीर सुनीता आणि बुच विल्मोर यांना अपेक्षेपेक्षा काही दिवस आधीच अंतराळातून परत आणले जाईल."

नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स व त्यांचे सहकारी बॅरी विल्मोर यांना घेवून बोइंग कंपनीचं 'स्टारलायनर' अंतराळयान ५ जून २०२४ रोजी अवकाशात झेपावलं होतं.

# पालघरमध्ये रस्त्यांसाठीच्या निधीचा गैरवापर- विवेक पंडित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पालघर :** जिल्ह्यात रस्त्यासाठी आलेल्या निधीचा गैरवापर करण्यात आल्याचा दावा राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी केला. त्याबाबत त्यांनी पुराव्यानिशी माहिती देत जिल्हा पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्याकडे तक्रार केली. तसेच कार्यकारी अभियंत्यांना गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. त्यांच्या तक्रारीनुसार शाखा अभियंता नीलकंठ कोकाटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.

विक्रमगड तालुक्यात जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विविध योजना राबवल्या जातात. या योजनांचा आढावा घेण्यासाठी विवेक पंडित यांनी बैठक बोलावली होती. या बैठकीत आदिवासी विकास कामांचा आढावा घेण्यात आला. आदिवासी उपयोजनेतून रस्त्यांच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात शासनाचा निधी येतो. यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप राज्यस्तरीय अनुसूचित क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी केला.

चौकशी अहवालात प्रकरण दडपण्याचा प्रयत्न- रस्ते गैरव्यवहाराची चौकशी करून त्याचा अहवाल देण्याचे निर्देश पंडित यांनी दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे तत्कालीन उपविभागीय अभियंता विष्णू बोरसे आणि शाखा अभियंता नीलकंठ कोकाटे यांनी अहवाल सादर केला. माजी आमदार विवेक पंडित यांच्या माहितीनुसार अहवालात बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आला. एकाच रस्त्याचे फोटो अनेक ठिकाणी वापरून रस्त्याचं काम झाल्याचं दाखवण्यात आलं. हे निदर्शनास आल्यानंतर आढावा बैठकीतच पंडित यांनी तत्कालीन उप अभियंता आणि शाखा अभियंत्यावर शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंत्यांना दिले होते.

### दिल्लीत सहा अधिकाऱ्यांना अटक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भ्रष्टाचार आणि लाचखोरी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) आज (दि. १२) दिल्ली वाहतूक विभागातील सहा अधिकाऱ्यांना अटक केली. सत्ताधारी आम आदमी पक्षाचा (आप) अलिकडच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर सीबीआयची ही पहिलीच मोठी कारवाई आहे. दिल्लीतील परिवहन विभागातील भ्रष्टाचाराविरुद्ध सीबीआयकडे तक्रारी आल्या होत्या. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईपूर्वी तक्रारींचे पडताळणी करण्यात आली. तक्रारींची पडताळणी करताना विविध पातळ्यांवर भ्रष्टाचार झाल्याचे प्राथमिक माहिती मिळाली.

## खेळण्यांसाठीची धडपड

पंढरी संचार छायाचित्र सेवा



युक्रेन — युक्रेनमधील डोनेस्तक प्रदेशातील कोस्टियानटिनिव्हका शहरात, रशियन हवाई हल्ल्यात नुकसान झालेल्या घरातून आपल्या नातीची खेळणी गोळा करण्यासाठी आजीची धडपड दिसून येते.

### शीख हत्येप्रकरणी सज्जन कुमार दोषी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शीखविरोधी दंगलीदरम्यान सरस्वती विहार परिसरात झालेल्या दोन जणांच्या हत्येप्रकरणी दिल्लीतील एका न्यायालयाने काँग्रेसचे खासदार सज्जन कुमार यांना दोषी ठरवले आहे. विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी शिक्षेचा आदेश देत शिक्षेवरील युक्तिवाद १८ फेब्रुवारीला ठेवला. कुमार यांना तिहार तुरुंगातून न्यायालयात हजर करण्यात आले. १ नोव्हेंबर १९८४ रोजी जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येशी संबंधित हे प्रकरण आहे. पंजाबी बाग पोलिस स्टेशनने सुरुवातीला गुन्हा दाखल केला असला तरी नंतर विशेष तपास पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली.

# महापुरुषांचा अवमान, कडक शिक्षा हवी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद असणारा कायदा करण्याची मागणी खासदार उदयनराजे भोसले यांनी केली. यासंदर्भात त्यांनी मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांची नवी दिल्लीत भेट घेऊन त्यांना निवेदन दिलं.

अलिकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राविषयी अवमानकारक वक्तव्ये करण्यात आली आहेत. त्यामुळं तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. त्याबद्दल तीव्र पडसादही उमटले आहेत. त्यामुळं महापुरुषांच्या बाबतीत खोडसाळपणाने अवमानकारक शेरेबाजी करणाऱ्यांवर कठोर



कारवाई करणारा कायदा पारित करावा, अशी मागणी उदयनराजेंनी अमित शाहांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

छत्रपतींचे एकूणच जीवनकार्य आणि स्वराज्य निर्मितीमधील योगदान जागतिक स्तरावर नेण्यासाठी शिवाजी महाराजांचे नवी दिल्लीत राष्ट्रीय स्मारक उभारलं पाहिजे. जेणेकरून राज्यशास्त्र, प्रशासन, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र, कायदा आणि अर्थशास्त्रातील अभ्यासकांसाठी ते पर्वणी ठरेल. त्याचबरोबर इतिहासाचे जतन आणि अचूक दस्तावेजीकरण सुनिश्चित होईल.

# ईडीच्या कार्यपद्धतीवर सर्वोच्च आक्षेप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** छत्तीसगड दारू घोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (१२ एप्रिल) तीव्र आक्षेप घेत एका आयएएस अधिकाऱ्याला जामीन मंजूर केला. कोणत्याही आरोपीला मुद्दाम तुरुंगात ठेवण्यासाठी मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याचा (पीएमएलए) गैरवापर करता येणार नाही, असे निरीक्षण ही सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय एजन्सीवर नोंदवले.

न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने छत्तीसगड दारू घोटाळ्याशी संबंधित पीएमएलए प्रकरणातील एका आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना हे निरीक्षण नोंदवले. न्यायमूर्ती ओक म्हणाले की, आरोपीला ८ ऑगस्ट २०२४ रोजी अटक करण्यात आली होती आणि तेव्हापासून तो कोठडीत आहे, तर उच्च न्यायालयाने तक्रारीची दखल घेत सत्र न्यायालयाचा आदेश रद्द बातल ठरवला होता.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती ओका यांनी केंद्रीय एजन्सी ईडीवर तोंडी टिप्पणी करताना म्हटले की, पीएमएलएची संकल्पना एखाद्या व्यक्तीला कोणत्याही बहाण्याने तुरुंगात ठेवण्याची खात्री करणे असू शकत नाही.

# माघी पौर्णिमेनिमित्त दीड कोटी भाविकांच्या स्नानाचा अंदाज

### महाकुंभ

त्रिवेणी संगमापासून १० किमी अंतरावर सर्वत्र भाविकांची गर्दी दिसून आली. मंगळवारी सायंकाळपासूनच माघी पौर्णिमेचे स्नान शुभ मुहूर्तावर सुरू झाले होते. येथे रात्री उशिरा मोठ्या संख्येने भाविक संगमावर पोहोचले. बुधवारी सकाळी भाविकांची संख्या वाढली. हे स्नान बुधवारी संध्याकाळपर्यंत सुरू राहील. आज सुमारे अडीच कोटी भाविक त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे.



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**प्रयागराज :** महाकुंभमेळ्यात माघ पौर्णिमेच्या निमित्ताने बुधवारी संगमावर दीड कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले. महाकुंभातील हे पाचवे शाही स्नान आहे. आतापर्यंत एकूण ४६.२५ कोटी भाविकांनी संगमात स्नान केली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

'नो व्हेईकल झोन'घोषित

आज भाविकांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. शहरात वाहनांना प्रवेश बंद असून महाकंभमेळा क्षेत्र'नो व्हेईकल झोन'घोषित करण्यात आले आहे. ही वाहतूक व्यवस्था १२ फेबुवारीपर्यंत स्नान पूर्ण होईपर्यंत लागू राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे डीजीपी प्रशांत कुमार यांनी सांगितले की,"महाकुंभातील हे पाचवे स्नान आहे. महाशिवरात्रीचे स्नान अजून बाकी आहे. मौनी अमावस्येच्या दिवशी एक चूक झाली. त्यातून धडा घेऊन अधिक चांगले व्यवस्थापन कसे करायचे? यावर आम्ही काम करत आहोत."

### रेल्वेची कशी आहे व्यवस्था?

● रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शशिकांत त्रिपाठी यांच्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून प्रयागराज रेल्वे स्थानकांवर भाविकांची गर्दी कायम आहे. दररोज १०० हून अधिक विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. ते पुढे म्हणाले की, मंगळवारी रात्री ९ वाजेपर्यंत १०८ विशेष गाड्या चालवण्यात आल्या. यात उत्तर मध्य रेल्वेने ८१ गाड्या, उत्तर रेल्वेकडून १० आणि ईशान्य रेल्वेने १७ विशेष गाड्या चालवण्यात आल्या. त्याचबरोबर, विशेष गाड्यादेखील सतत चालवल्या जात आहेत.



> मला माहित्येय की मी चांगली फलंदाजी करतोय. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये मी चांगली कामगिरी केली आहे. यंदाच्या रणजी हंगामातही माझी कामगिरी समाधानकारक झालेली आहे. २०२३च्या WTC फायलनमध्ये मी उत्तम फलंदाजी केली होती. त्यानंतर मला संघातून वगळण्यात आले. तुमची निवड होणे किंवा न होणे, ही वेगळी गोष्ट आहे आणि ते निवड समितीचं काम आहे, परंतु मी WTC Final मध्ये खरंच चांगला खेळलो होतो, असे मला वाटते. संघातून वगळले असले तरी त्याची खेळत राहण्याची आणि धावा करण्याची प्रेरणा कमी झालेली नाही. त्याने सांगितले, माझ्यात अजून बरेच क्रिकेट शिल्लक आहे. त्यामुळेच मी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने खेळतोय. सकारात्मक दृष्टीने खेळत राहणे, हे एकच ध्येय माझ्या मनात आहे आणि त्यानंतर जे घडायचंय ते घडू दे.
>
> — अजिंक्य राहणे

# भारताचा मालिकाविजय

## शुभमन गिलचे शतक; हर्षित आणि अर्शदीपला २-२ विकेट्स




**अहमदाबाद :** भारताने इंग्लंडला तिसऱ्या वनडे मालिकेत १४२ धावांनी पराभूत करत दणदणीत विजय मिळवला आहे. यासह भारताने या वनडे मालिकेत इंग्लंडवर निर्भेळ मालिका विजय नोंदवला. शुबमन गिलचे शतक, विराट कोहलीचं कमबॅक अर्धशतक, श्रेयस अय्यरची वादळी खेळी आणि गोलंदाजांच्या शानदार कामगिरीच्या जोरावर भारताने तिसऱ्या वनडे सामन्यात दणदणीत विजय नोंदवला. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतासाठी हा मालिका विजय खूप महत्त्वाचा ठरला आहे. भारतीय संघ खूप काळानंतर वनडे सामने खेळण्यासाठी उतरला होता, पण भारताच्या सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आयसीसी स्पर्धेसाठी संघांची तयारी चांगली कशी आहे हे दाखवून दिले.

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतासाठी हा मालिका विजय खूप महत्त्वाचा ठरला आहे. भारतीय संघ खूप काळानंतर वनडे सामने खेळण्यासाठी उतरला होता, पण भारताच्या सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आयसीसी स्पर्धेसाठी संघांची तयारी चांगली कशी आहे हे दाखवून दिले.

रोहित शर्माने शतक झळकावत तर विराट कोहलीने अर्धशतक झळकावत मोठ्या प्रतिक्षेनंतर पुनरागमन केलं. तर मोहम्मद शमीने देखील फिट होत संघात पुनरागमन करत चांगली कामगिरी केली. श्रेयस अय्यरलाही मोठ्या कालावधीनंतर संघात संधी मिळाली आणि त्याने पहिल्याच सामन्यापासून प्रभावी कामगिरी केली आणि आपल्या खेळीची छाप पाडली.

भारताने प्रथम फलंदाजी करताना ३५६ धावांची मोठी धावसंख्या उभारली. शुबमन गिलने शतक झळकावत शानदार कामगिरी केली तर भारताच्या टॉप फलंदाजांनी मोठ्या धावसंख्येचं योगदान दिलं आहे. इंग्लंडचा संघ प्रत्युत्तरात २१४ धावा करत सर्वबाद झाला.

भारतीय संघ नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता. रोहित शर्माच्या रूपात भारताला सुरूवातीलाच धक्का बसला. पण भारताचा रनमशीन विराट कोहलीने शुबमन गिलबरोबर संघाचा डाव उचलून धरला. टीम इंडियाच्या विजयाचा हिरो शुभमन गिल होता, ज्याने आपल्या वनडे कारकिर्दीतील ७वे शतक झळकावले. गिलने १४ चौकार आणि ३ षटकारांसह ११२ धावा केल्या. गिलशिवाय श्रेयस अय्यरने ७८ धावांची खेळी केली, तर विराट कोहलीनेही ५२ धावांची खेळी केली. विराट कोहलीने ४५१ दिवसांनंतर वनडे क्रिकेटमध्ये अर्धशतक झळकावले.

## बुमराहसह जैस्वालही चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने मंगळवारी रात्री उशीरा चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेबाबत मोठी घोषणा केली. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या प्राथमिक संघात अखेरच्या क्षणी दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पूर्ण तंदुरुस्त नसल्याने या स्पर्धेला मुकणार असल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. याशिवाय यशस्वी जैस्वाललाही संघातून वगळण्यात आले आहे.

बीसीसीआयने बुमराहच्या जागेवर हर्षित राणाला, तर जैस्वालच्या जागेवर फिरकीपटू वरुण चक्रवर्तीला भारतीय संघात स्थान दिले आहे. मंगळवापर्यंत सर्व सहभागी संघांना त्यांनी निवडलेल्या संघात बदल करता येणार होते. त्यामुळे बीसीसीआयनेही मंगळवारी संघात बदल करत त्याची अधिकृत घोषणा केली.

जैस्वालचा समावेश आता राखीव खेळाडूंमध्ये करण्यात आला आहे. त्याच्यासोबत शिवम दुबे आणि मोहम्मद सिराज यांचाही राखीव खेळाडूंमध्ये समावेश आहे. हे खेळाडू संघासोबत दुबईला जाणार नाहीत. पण जर गरज पडली, तर ते दुबईला रवाना होतील. जसप्रीत बुमराहला जानेवारीच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील शेवटचा कसोटी सामना खेळताना पाठीला दुखापत झाली होती. या दुखापतीमुळे त्याला आता चॅम्पियन्स ट्रॉफीलाही मुकावे लागणार आहे.

भारतीय संघाला तो या स्पर्धेपर्यंत तंदुरुस्त होईल, अशी अपेक्षा होती. त्यामुळे त्याचा समावेश प्राथमिक संघात करण्यात आला होता. बुमराह राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्येही त्याच्या दुखापतीचे अवलोकन करण्यासाठी दाखल झाला होता. पण अखेर तो चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पूर्ण तंदुरुस्त नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## साई फुटबॉल ॲकॅडमी, रायझिंग पुणे संघांची विजयी कामगिरी

**पुणे :** आर. एम. स्पोटर्स कन्सेप्ट्स आणि पुणे जिल्हा फुटबॉल संघटना (पीडीएफए) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेच्या ९ वर्षाखालील गटात साई फुटबॉल ॲकॅडमी, कॉशन्ट्स स्पोटर्स, फोर लायन्स् रावेत, मेट्रोसिटी एफए आणि रायझिंग पुणे एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली. चांदणी चौक येथील प्लेझेन-मॅंगो टीवर्ल्ड मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ९ वर्षाखालील गटाच्या सामन्यामध्ये साई फुटबॉल ॲकॅडमीने पुणे पायोनिअर्स एफसी संघाचा ७-० असा सहज पराभव केला. संघाकडून राजवीर हेडा आणि सलाउद्दीन शेख यांनी २ गोल तर, वीराज घोसळे, सक्षम वाघेला, शिववर्धन दगडे यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. एकतर्फी झालेल्या सामन्यामध्ये कॉशन्ट्स स्पोटर्स संघाने व्हिजन स्पोटर्स संघाचा ५-२ असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये कविश नाईक, साईनील मिश्रा, इवान मुखर्जी, अयांश पांधारे यांनी गोलपूर्ण कामगिरी केली. दिवीज पाटणकर याने केलेल्या दोन गोलांच्या जोरावर मेट्रोसिटी एफए संघाने यंग स्टेप्स् ॲकॅडमीचा २-१ असा पराभव केला. ९ वर्षाखालील गटाच्या सामन्यामध्ये फोर लायन्स् रावेत संघाने स्पोर्टस्व्हिला ॲकॅडमीचा ५-० असा सहज पराभव केला. रायझिंग पुणे एफसी संघाने मॅथ्युज् फुटबॉल ॲकॅडमीचा ७-२ असा एकतर्फी पराभव केला. सामन्यामध्ये अहान पवार आणि चिराग कलाल यांनी प्रत्येकी दोन गोल तर, अबीर खडसे, विहान पाटील, शनय मोरडे यांनी प्रत्येकी एकेक गोल मारले.फोर लायन्स् वाकड संघाने सिग्मय पुणे एफसी संघाचा ८-० असा तर, स्टॅलियन्स् पुणे एफसी संघाने पुणे पायोनिअर्स एफसीचा ६-२ असा सहज पराभव केला.



## माऊंटन बायकिंगमध्ये प्रणिताला सुवर्ण, ऋतिकाला कांस्य

**पुणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील माऊंटन बायकिंगमधील एमटीबी सायकलिंग प्रकारात महाराष्ट्राची आंतरराष्ट्रीय सायकलपटू प्रणिता सोमण हिने लागोपाठ सलग दुसरे सुवर्णपदक पटकावले. याच प्रकारात ऋतिका गायकवाडने कांस्यपदक संपादन केले. निसर्गरम्य उत्तराखंडच्या साततात डोंगरदऱ्यातील खडकाळ मार्गावरील सात फेऱ्यांची शर्यत प्रणिता सोमणने एक तास 22 मिनिटे 10.818 सेकंदात पूर्ण केली. तिची सहकारी व नाशिकची खेळाडू ऋतिका गायकवाड हिने कांस्यपदक जिंकताना हेच अंतर एक तास 27 मिनिटे 5.623 सेकंदात पार केले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथमच माउंटन बाईकिंग या खेळाचा समावेश करण्यात आला आहे. प्रणिता हिने क्रॉस कंट्री टाईम ट्रायल प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. टाईम ट्रायल मधील अव्वल यशामुळे आज तिने अतिशय आत्मविश्वासाने ही शर्यत जिंकली. टाईम ट्रायल शर्यतीप्रमाणे आजही तिला कर्नाटकची आंतरराष्ट्रीय सायकलपटू स्टार नरझरी हिचे आव्हान होते. मात्र, प्रणिता हिने तिला कसे मागे ठेवायचे याचे योग्य नियोजन करून सलग दुसऱ्या सुवर्णयशाला गवसणी घातली. टाईम ट्रायलमध्ये काल सुवर्णपदक जिंकले होते. त्यामुळे माझा आत्मविश्वास उंचावला होता. आज त्याचा फायदा घेत अन्य स्पर्धकांवर मात करू माझे सहकारी ऋतिका हिला कास्यपदक मिळाल्यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. असे प्रणिता हिने सांगितले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक मिळवण्याचे माझे ध्येय साकार झाल्यामुळे मला खूपच समाधान झाले आहे.



## क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील लोकप्रिय युवा सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या वाढदिवसानिमित्त सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने १५ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत "सुपर सनी विक" या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना सोमेश्वर फाउंडेशनचे आणि या स्पर्धांचे मुख्य समन्वयक प्रताप जाधव यांनी सांगितले की गुणवान व उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सनी विनायक निम्हण यांच्या वाढदिवसानिमीत्त या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. व्यसनमुक्तीचा संदेश समाजामध्ये देण्यासाठी, तरुणांमध्ये व्यायामाची आवड निर्माण करणे या उद्देशाने या स्पर्धा होणार असल्याचे समन्वयक उमेश वाघ यांनी सांगितले. या सप्ताहात पुणे व पिंपरी चिंचवड शहरास जोडणारी, व्यसनमुक्तीचा संदेश देणारी पुणे ट्वीन सिटी मॅरेथॉन, रन फॉर अमृतकाल स्पर्धेचे आयोजन पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक संघटनेच्या मान्यतेने व सहकार्याने रविवार, २३ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

शिक्षणाचे माहेर घर असलेले पुणे शहर व औद्योगिक क्रांतीचे प्रतिनिधित्व करणारे पिंपरी चिंचवड यांच्यातील सहकार्य व सामंजस्यचा दुवा दर्शवणारी ही स्पर्धा असेल. ही मॅरेथॉन स्पर्धा २१ किमी, १० किमी, ५ किमी आणि ३ किमी प्रकारात होणार आहे. महाळुंगे - बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये पहाटे ५ वाजता सुरू होणाऱ्या या स्पर्धेमध्ये २५,००० हुन अधिक धावपटूंनी आपला सहभाग निश्चित केला आहे. या मॅरेथॉन मधील सर्व सहभागी धावपटूंना टी शर्ट, गुडी बॅग, पदक, ई टायमिंग प्रशस्तिपत्रक, वैद्यकीय सुविधा विनामूल्य देण्यात येणार आहेत.

### वैष्णवी आडकर, तर दुहेरी पूजा-आकांक्षा जोडीचे रुपेरी यश

## टेनिसमध्ये महाराष्ट्राला दोन रौप्यपदके!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी टेनिसमधील महिलांच्या वैयक्तिक विभागात दोन रौप्यपदकांची कमाई केली. पुण्याची खेळाडू वैष्णवी आडकर हिला एकेरीमध्ये अंतिम सामन्यात गुजरातच्या वैदेही चौधरी हिच्याकडून पराभूत व्हावे लागले, तर दुहेरी मध्ये पूजा इंगळे व आकांक्षा निठुरे यांना वैदेही व तिची सहकारी झील देसाई यांच्याकडून हार स्वीकारावी लागली.

एकेरीतील सरळ लढतीत वैदेही हिने वैष्णवीचे आव्हान ६-४, ६-४ असे सहज परतविले. या दोन्ही सेट्समध्ये वैदेही हिने फोरहँड परतीच्या फटक्यांचा सुरेख खेळ केला. तसेच तिने बेसलाईनवरून व्हॉलीजचा कल्पकतेने उपयोग केला. वैष्णवी हिने दोन्ही सेट्समध्ये सर्व्हिस राखण्याचा कसोशीने प्रयत्न केला. मात्र, तिच्याकडून झालेल्या नकळत चुकांचा वैदेही हिला फायदा झाला.

सामना संपल्यानंतर वैष्णवी म्हणाली," वैदेही विरुद्ध आज माझा अपेक्षेइतका अव्वल दर्जाचा खेळ होऊ शकला नाही. तसेच मला महत्त्वाच्या क्षणी सर्व्हिसवर नियंत्रण ठेवता आले नाही. अर्थात हे रौप्यपदकही माझ्यासाठी प्रेरणादायक आहे. अजून भरपूर मला संधी उपलब्ध आहेत. त्या दृष्टीनेच येथील कामगिरी माझ्यासाठी शिकवण्याची शिदोरीच आहे.

**दुहेरीत पूजा-आकांक्षा पराभूत**

महाराष्ट्राच्या पूजा इंगळे व आकांक्षा निठुरे यांना अंतिम सामन्यात वैदेही चौधरी व झील देसाई या अव्वल दर्जाच्या खेळाडूंविरूध्द पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

वैदेही व झील यांनी हा सामना ६-३, ६-२ असा जिंकला. दोन्ही सेटमध्ये गुजरातच्या या जोडीने क्रॉसकोर्ट फटक्यांचा बहारदार खेळ केला. तसेच त्यांनी सर्व्हिस व प्लेसिंग यावर चांगले नियंत्रण ठेवले होते. त्या तुलनेमध्ये महाराष्ट्राच्या जोडीला दोन्ही सेट्स मध्ये स्वतःच्या सर्व्हिस व परतीच्या फटक्यांवर नियंत्रण ठेवता आले नाही. त्याचाही फायदा गुजरातच्या जोडीला झाला.

हा सामना झाल्यावर आकांक्षा व पूजा यांनी सांगितले की, अंतिम फेरीत आम्हाला जरी पराभव पत्करावा लागला तरी देखील या कामगिरी बाबत आम्ही समाधानी आहोत. येथील रुपेरी कामगिरी आम्हाला भावी करिअरसाठी उपयुक्त ठरणार आहे. अजून भरपूर स्पर्धांमध्ये आम्हाला भाग घ्यावयाचा आहे. येथील अनुभव त्या दृष्टीनेच महत्त्वाचा आहे.

## कुंडलच्या कुस्ती मैदानात गौरव मच्छवाडाची बाजी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** कुंडल (ता. पलूस) येथील महाराष्ट्र कुस्ती मैदानात प्रथम क्रमांकाच्या लढतीत पंजाबच्या गौरव मच्छवाडा याने महाराष्ट्र केसरी हर्षल सदगिर याला हफ्ता डावावर चितपट करत विजय मिळवला. दोन्ही पैलवानांच्यात बराच वेळ खडाखडी सुरू होती.

११ व्या मिनटाला गौरवने कुस्ती जिंकली.सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महाराष्ट्र कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी खा. विशाल पाटील, आ. विश्वजित कदम, आ. अरुण लाड, क्रांती कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड, माजी खासदार संजयकाका पाटील आदी उपस्थित होते. या वेळी आजी-माजी खासदारांमध्ये गप्पांची मैफल चांगलीच रंगली होती. माऊली जमदाडे विरुद्ध प्रिन्स कोहली यांच्यात झालेल्या कुस्तीत चौथ्या मिनिटाला प्रिन्स कोहलीने माऊलीवरती घिस्सा डावावर विजय मिळवला.

## विजय क्रिकेट, सीएसआर संघांनी उद्घाटनाचा दिवस गाजवला



**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'रायझिंग स्टार करंडक' १० वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत विजय क्रिकेट ॲकॅडमी, सीएसआर स्पोटर्स आणि कोद्रे फार्म्स क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला. सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत चेतनअभिराम रेड्डी याने फटकावलेल्या धावांच्या जोरावर सीएसआर स्पोटर्स संघाने क्षेत्रम क्रिकेट ॲकॅडमीचा १९ धावांनी पराभव केला. सीएसआर संघाच्या चेतनअभिराम रेड्डी याने ३० धावा आणि अन्श चव्हाण याने २५ धावा करून संघाच्या विजयात प्रमुख भुमिका बजावली. दुसऱ्या सामन्यामध्ये अर्णव धोके याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे कोद्रे फार्म्स क्रिकेट ॲकॅडमीने पीआर शिवराय क्रिकेट ॲकॅडमीचा ३३ धावांनी पराभव केला. विजय क्रिकेट ॲकॅडमीने पहिल्याच दिवशी सलग दोन विजय मिळवले. दोन्ही सामन्यांमध्ये फिरकीपटू सुफियान शेख याने गोलंदाजीमध्ये कमाल करून संघाला विजयी केले. पहिल्या सामन्यामध्ये सुफियान शेख याने २ धावांमध्ये ४ गडी बाद करून कोद्रे फार्म्स क्रिकेट ॲकॅडमी विरूध्दच्या सामन्यामध्ये संघाला ६३ धावांनी विजय मिळवून दिला. दुसऱ्या सामन्यामध्ये सुफियान शेखच्या गोलंदाजीमुळे विजय ॲकॅडमीने एके स्पोटर्स संघाचा ७२ धावांनी धुव्वा उडविला. सामन्यात सुफियान शेख याने ८ धावांमध्ये ३ गडी बाद केले.

## ऑस्ट्रेलियाच्या संघाने श्रीलंकेसमोर गुडघे टेकले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाविरूद्ध पहिल्या वन-डे सामन्यात एकहाती बाजी मारली. ऑस्ट्रेलियाचे ५ प्रमुख खेळाडू चॅम्पियन्स ट्रॉफी संघातून बाहेर झाल्यानंतर युवा खेळाडूंचा भरणा असलेला ऑस्ट्रेलिया संघ स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वात मैदानात उतरला. प्रथम गोलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेचा डाव २१४ धावांवर गुंडाळला व सोपे आव्हान स्वीकारले. पण गाठण्यात युवा ऑस्ट्रेलियन फलंदाज अपयशी ठरले व ऑस्ट्रेलियाने ४९ धावांनी सामना गमावला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेच्या अवघ्या ३ खेळाडूंनी सामन्यात दुहेरी धावा केल्या. तर कर्णधार चरिथ असलंकाने शतक ठोकले. त्याच्या शतकी खेळीच्या मदतीने श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाला विजयसाठी २१५ धावांचे आव्हान दिले आहे. सलामीवीर पथुम निसंका (४) व अविष्का फरर्नांडो (१) धावा करून बाद झाले. कुसल मेंडिसला अवघ्या १९ धावा करता आल्या. तर जनिथ लियांगे ११ धावा करू शकला.

चरिथ असलंका श्रीलंकेचा सातव्या क्रमांकाचा फलंदाज दुनिथ वेल्लालागे ६७ धावांची भागीदारी केली. दुनिथ वेल्लालागे चांगली फलंदाजी करत होता. पण २६ व्या षटकात ५ व्या चेंडूवर त्याला झेलबाद होऊन परतावे लागले. स्टीव्ह स्मिथने स्लिपमध्ये झेल अप्रतिम घेत त्याला माघारी पाठवले. चरिथ असलंकाने सामन्यात कप्तानी खेळी केली. त्याने १४ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने सामन्यात एकूण १२६ चेंडूत १२७ धावांची खेळी केली.

२१५ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा डाव अवघ्या १६५ धावांवर संपुष्टात आला. श्रीलंकन गोलंदाजांनी घरच्या मैदानाचा फायदा घेत ऑस्ट्रेलियन फलंदाजांना फार काळ मैदानावर टीकू दिले नाही. ऑस्ट्रेलियाचे सालीमीवर अवघ्या ७ धावांवर माघारी परतले. कर्णधार स्मिथही १२ धावांवर माघारी परतला. मधल्या फळीतील फलंदाजांनी धावा उभारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही.

## आफ्रिकेचे कोच खेळाडूच्या जागी फिल्डिंगसाठी उतरले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सध्या दक्षिण आफ्रिकेचा संघ पाकिस्तानच्या दौऱ्यावर आहे, जिथे तो तिरंगी मालिका खेळत आहे. या मालिकेत १० फेब्रुवारीला लाहोरमध्ये न्यूझीलंडविरूद्ध सामना खेळवला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३०४ धावा केल्या. प्रत्युत्तरात आफ्रिकेचा संघ धावसंख्येचा बचाव करण्यासाठी मैदानात उतरला तेव्हा त्यावेळी मैदानावर दृश्य आश्चर्यचकित करणारे होते. आफ्रिकेचे कोच मैदानात क्षेत्ररक्षण करण्यासाठी उतरले होते.

दक्षिण आफ्रिकेचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक वांडिले ग्वावू न्यूझीलंडविरूद्ध सामन्यात मैदानावर क्षेत्ररक्षण करताना दिसले. दक्षिण आफ्रिकेच्या संघाशी संबंधित ही पहिलीच घटना नाही. कारण, याआधी त्यांचे फलंदाजी प्रशिक्षकही मैदानावर उतरले होते.

चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी महत्त्वपूर्ण अशा सामन्यात खेळाडूंऐवजी आफ्रिकेचे फिल्डिंग कोच मैदानावर क्षेत्ररक्षण करण्यासाठी का उतरले, असा प्रश्न सर्वांना पडला आहे. लाहोरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला खेळाडूंची कमतरता भासत असल्याने संघाला हा निर्णय घ्यावा लागला.

## तलब क्वालिटी, ओबेरॉय आणि नील संघांचा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुना क्लब लिमिटेडच्या वतीने अकराव्या पुना क्लब प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत साखळी फेरीत व्हीएनएन तलब क्वालिटी वॉरियर्स, ओबेरॉय आणि नील किंग्ज या संघांनी सलग दुसरा विजय मिळवला.

पुना क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत झियान तलब(नाबाद ५९ व १-४)याने केलेल्या उत्कृष्ट खेळीच्या जोरावर व्हीएनएन तलब क्वालिटी वॉरियर्स संघाने परमार ऑल स्टार्स संघाचा ३४ धावांनी पराभव करून दुसरा विजय मिळवला. काल रात्री उशिरा झालेल्या लढतीत भार्गव पाठक १-१३ व नाबाद ६७) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाने जेट्स संघावर ८ गडी राखून विजय मिळवला. क्रिश शहा याने नाबाद ६४ धावांच्या जोरावर जीएम टायफून्स संघाने फोर ओक्स सेलर्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. आधिश शहा(२-२ व ४२धावा) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर ओबेरॉय आणि नील किंग्ज संघाने हिलयॉस इगल्स संघाचा ७ गडी राखून पराभव करून दुसरा विजय मिळवला.

## सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग २०२४-२५ फुटबॉल स्पर्धा

# यजमान सेंट व्हिन्सेंट एचएस विजेता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** यजमान सेंट व्हिन्सेंट एचएसने सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग २०२४-२५ फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत , सेंट व्हिन्सेंटने हिलग्रीनचा ३-१ असा पराभव करत एकूण दहावा विजय मिळवला आणि सहा आठवड्यांच्या स्पर्धेत ३१ गुणांसह (१३ सामने) अव्वल स्थानी झेप घेतली. त्याचप्रमाणे दस्तूर बॉईजविरुद्धचा शेवटचा सामना २-० असा जिंकणाऱ्या विद्या व्हॅलीने २९ गुणांसह (१३ सामने) दुसरे स्थान मिळवले. विद्या व्हॅलीच्या तुलनेत कमी गोल फरकामुळे लोयोला एचएसला (२९ गुण) तिसरे स्थान मिळाले. हचिंग्ज संघ (२६ गुण) चौथ्या स्थानावर आहे.

लीगच्या शेवटच्या दिवशी, सेंट व्हिन्सेंटला लीग जिंकण्यासाठी विजयाची गरज असताना ॲन्विक लोबो (२) आणि जेवंश व्यास यांच्या (१) सुरेख कामगिरीमुळे हिलग्रीनवर ३-१ अशी मात केली. हिलग्रीनकडून एकमेव गोल ओम शिवरकरने गोल केला. या विजयामुळे सेंट व्हिन्सेंटची विजयाची संख्या १० वर गेली. लीगमधील हे सर्वाधिक विजय आहेत. या व्यतिरिक्त २ पराभव आणि १ ड्रॉ त्यांच्या नावे आहेत. शेवटच्या फेरीत ( पाचवा आठवडा) द कल्याणी स्कूल, यजमान सेंट व्हिन्सेंट एचएस आणि विद्या व्हॅली संघांनी विजयी कामगिरीमध्ये सातत्य राखताना टॉप-४ संघांमध्ये स्थान कायम राखले.

स्पर्धेच्या अंतिम दिवशी, यजमान सेंट व्हिन्सेंट एचएसने ३ सामन्यांतून ७ गुण मिळवले. रायन पंजाबी (२) आणि जेवंश व्यासमुळे (१) त्यांनी क्लाईन मेमोरियलवर ३-० असा विजय मिळविला. त्यानंतर त्यांनी श्री श्री रविशंकरचा अयान राऊत आणि ॲन्विक लोबोच्या नेटच्या सहाय्याने २-० असा पराभव केला. तिसऱ्या सामन्यात त्यांनी एरिन नोश नगरवालाविरुद्ध गोलशून्य बरोबरी साधली. त्यावेळी सेंट व्हिन्सेंट एचएस (२८ गुण १२ सामने) दुसऱ्या स्थानावर होता. मात्र, एक सामना शिल्लक होता. त्यांचा कट्टर प्रतिस्पर्धी लोयोला (२९ गुण; १३ सामने) पुढे होता.